मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | सोमवार, २० जानेवारी २०२५ | वर्ष- २९ | अंक - २११ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



विद्यार्थ्यांचा जय, म्हणजे शाळेचा विजय !

पान ४

## गोव्यात पॅराग्लायडिंग करताना पुण्यातील तरुणीचा मृत्यू


**पणजी:** पॅराग्लायडिंगमुळे पुण्यातील एका तरुणीला तिचा जीव गमवावा लागल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेत तिच्यासोबत असलेल्या नेपाळी पायलटदेखील मरण पावला आहे. शिवानी असे या अपघातात मृत्यू झालेल्या 27 वर्षीय तरुणीचे नाव आहे. गोव्यातील क्री पठार, केरी, पेडणे येथे पॅराग्लायडिंग करताना हा अपघात झाला आहे. परवानगीशिवाय आणि योग्य सुरक्षा उपकरणांशिवाय पॅराग्लायडिंग केल्यामुळे या अपघातात पुण्यातील 27 वर्षीय शिवानी आणि 26 वर्षीय पायलट सुमन नेपाळी याचा उंचीवरुन कोसळून मृत्यू झाला. गोवा पोलिसांनी पॅराग्लायडिंग कंपनीचा मालक शेखर रायजादा नामक व्यक्तीला अटक केली आहे.

### म ह त्वा चे

## बीडमध्ये भरधाव बसने तिघांना चिरडले



**बीड :** बीडजवळ एक भीषण अपघात घडला आहे. रस्त्याच्या कडेला व्यायाम करत असलेल्या पाच तरुणांना भरधाव एसटी बसने उडवले. यात तीन तरुणांचा मृत्यू झाला आहे तर दोन जण गंभीर जखमी आहेत. जखमींना बीड जिल्ह्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस भरतीची तयारी करत असलेल्या तरुणांना भरधाव एसटीने उडवले आहे. रस्त्याच्या कडेला रनिंग करत असताना पाचही तरुणांना एसटीने जोरदार धडक दिली. रविवारी सकाळी हा अपघात झाला आहे. बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघात झाला. बीड परळी मार्गावर बीडहून परभणीला जाणाऱ्या एसटी बसने घोडका राजुरी फाटा येथे रस्त्याच्या कडेला व्यायाम करत असलेल्या पाच तरुणांना उडवले. अपघातात तीन तरुणांचा मृत्यू झाला आहे तर दोन जण जखमी आहेत. हे सर्व तरुण पोलीस भरतीची तयारी करत होते. त्यासाठी सकाळी-सकाळी रस्त्याच्या कडेला रनिंग करत होते. मृतांची ओळख पटली असून सुबोध बाबासाहेब मोरे, ओम सुग्रीव घोडके आणि विराट बब्रुवान घोडके असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तीन तरुणांची नावे आहेत. दोन जखमींना बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुर्दैवाने अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणांची आयुष्य आपण परत आणू शकत नाही, परंतु त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेला दुःखाचा डोंगर पाहता, फुल ना फुलाची पाकळी म्हणून एस.टी. महामंडळाकडून त्यांच्या कुटुंबीयांना 10 लाख रुपयांची मदत देण्याची निर्देश परिवहन मंत्री म्हणून मी एसटी प्रशासनाला दिली आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.



## मनू भाकरच्या मामा आणि आजीचा भीषण अपघातात मृत्यू

**महेंद्रगड :** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी नेमबाज मनू भाकर हिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भीषण रस्ते अपघातामध्ये तिच्या मामाचा आणि आजीचा मृत्यू झाला. रविवारी सकाळी नऊच्या सुमारास हरयाणातील चरखी दादरी जवळील महेंद्रगड बायपास रोडवर हा अपघात झाला. मनू भाकरचे मामा आणि आजी स्कूटरवर जात असताना भरधाव वेगात झालेल्या ब्रेझा कारने त्यांना उडवले. या अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पण तोपर्यंत ब्रेझा गाडीचा चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी मनू भाकर हिच्या मामा आणि आजीचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या घटनेमुळे मनू भाकरवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### ‘रायगड’च्या पालकमंत्रीपदामुळे महायुतीत धुसफूस

# मंत्री गोगावलेंच्या 32 समर्थकांचे राजीनामे

## गोगावले मंत्री झाले पण पालकत्व तटकरेंच्या पदरात पडल्याने सेनेत नाराजी

प्रतिनिधी

**महाड**

राज्यातील पालकमंत्र्यांची यादी काल जाहीर झाली. त्यानंतर या निर्णयाचे कुठे चांगले तर कुठे वाईट पडसाद उमटले. रायगडचा पालकमंत्री कोण होणार, याकडे सर्वांचे लक्ष असतानाच या यादीत रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांना डच्चू मिळाल्याने गोगावले समर्थक प्रचंड आक्रमक झाले आहेत. हे कार्यकर्ते एवढ्यावरच न थांबता या कार्यकर्त्यांनी रात्रीपासून महाडजवळील मुंबई-गोवा महामार्गावर टायर जाळून या निर्णयाचा निषेध केला. आज सकाळी



दक्षिण रायगड जिल्ह्यातील एकूण 32 गोगावले समर्थक आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे तडकाफडकी राजीनामे देखील दिले.

### एकनाथ शिंदे दरे गावी गेल्याने नाराजीची चर्चा

**सातारा –** पालकमंत्रीपदाच्या यादीत शिवसेनेचे नेते दादा भुसे आणि भरत गोगावले यांना स्थान मिळालेले नाही. दादा भुसे आणि भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद न मिळाल्याने पुन्हा एकदा एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा रंगली आहे. कारण ते त्यांच्या साताऱ्यातील दरे गावी गेले आहेत. महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर सरकार स्थापनेवेळी महायुतीत धुसफूस सुरु होती. यानंतर आता पालकमंत्रिपदावरून पुन्हा एकदा महायुतीत धुसफूस सुरु झाल्याचे समजते. भुसे आणि गोगावले यांना पालकमंत्रिपद देण्यात यावे, अशी शिंदे यांची इच्छा होती.

यामुळे आता महायुतीतील पालकमंत्रीपदाचा वाद चिघळणार आहे. आज गोगावले यांनी त्यांच्या निवासस्थानी बैठक आयोजित केली होती. बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांना शांत राहण्याच आवाहन केलं. रायगडचे पालकमंत्रीपद मिळालं नाही म्हणून एवढी काळजी करू नका. तुमचे माझ्यावर अनंत उपकार आहेत, ते मी कधीच विसरणार नाही, अशा शब्दात गोगावले यांनी संतापलेल्या शिवसैनिकांना समजावलं.



## महाकुंभात आग

- गीता प्रेसमधील 180 कॉटेज जळाले
- स्वयंपाक करताना सिलिंडरचा स्फोट झाल्याची शक्यता

**प्रयागराज**

प्रयागराजमधील महाकुंभ मेळा परिसरात दुपारी साडेचार वाजता आग लागली. शास्त्री पुलाजवळील सेक्टर 19 मधील गीता प्रेस कॅम्पमध्ये ही आग लागली. आगीत गीता प्रेसच्या 180 कॉटेज जळून खाक झाल्या.

स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, स्वयंपाक करताना सिलिंडरचा स्फोट झाला. यानंतर अनेक सिलिंडरचा स्फोट झाला. आग विझविण्यासाठी 12 अग्निशमन दलाच्या गाड्या पाठवण्यात आल्या. अग्निशमन दलाने सुमारे तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत 50 तंबू जळाले. तर, एका संन्याशाच्या एक लाख रुपयांच्या नोटाही जळाल्या.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री योगींना फोन करून घटनेची संपूर्ण माहिती घेतली. आगीच्या घटनेच्या काही काळापूर्वी मुख्यमंत्री योगींनी हेलिकॉप्टरमधून महाकुंभमेळा परिसराची पाहणी केली होती.

## जनमानसात खराब प्रतिमा असणाऱ्यांना पक्षात घ्यायचं नाही - अजित पवार

**शिर्डी**

जनमानसात ज्याची प्रतिमा खराब असेल अशा लोकांना पक्षात घ्यायचं नाही, अशी भूमिका राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली आहे. “पक्षातील पदाधिकारी व नेत्यांकडून कोणतेही गैरवर्तन होता कामा नये”, अशा सूचना देखील अजित पवार यांनी पक्षाच्या शिबिरातून नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या आहेत.

अजित पवारांच्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे चालू असलेल्या पक्षाच्या नवसंकल्प शिबिरास आज अनेक नेत्यांनी हजेरी लावत पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील या शिबिरास उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी परिवाराशी संवाद साधला.

पान 5 वर



### मी अभिमन्यु नाही, अर्जुन आहे!

मी राष्ट्रवादीच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणाआडून मला जाणीवपूर्वक 'टार्गेट' केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटते. पक्षातील काही लोक देखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र तरीही माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव असल्याने या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही, कारण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे, असे मत आज मंत्री धनंजय मुंडे यांनी शिबिरात व्यक्त केले.

## मराठी बंधु-भगिनींच्या प्रेमातच राहायचे आहे - मुख्यमंत्री फडणवीस



**बर्न**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झुरीक, स्वित्झर्लंड येथे बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडतर्फे उत्साहात स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभात मुख्यमंत्री फडणवीस यांनी वैश्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बंधु-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला. बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडच्या प्रेमाचे मोल नाही, मला या प्रेमातच राहायचे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, आपला महाराष्ट्र भारताचे

पान 5 वर

## अजून एका संशयिताला अटक

### 5 दिवसांची पोलिस कोठडी

प्रतिनिधी

**मुंबई**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानच्या घरात घुसून त्याच्यावर हल्ला केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी एका आरोपीला अटक केल्याचा दावा केला आहे. रविवारी सकाळी पत्रकार परिषदेत पोलिसांनी सांगितले की, आरोपीला शनिवारी रात्री 2 वाजता ठाण्यातील कामगार छावणीतून अटक करण्यात आली.

मुंबई पोलिसांचे डीसीपी गेडाम दीक्षित म्हणाले की, आरोपी चोरीच्या उद्देशाने अभिनेत्याच्या घरात घुसला होता. त्याच्याकडे कोणतेही वैध



भारतीय कागदपत्रे नाहीत. त्याच्याजवळ सापडलेल्या वस्तूंवरून तो बांगलादेशी असल्याचा संशय आहे. मुंबई पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले, त्याला 5 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद असल्याचेही पोलिसांनी सांगितले. त्याचे वय 30 वर्षे आहे. बेकायदेशीरपणे भारतात आल्यानंतर त्याने आपले नाव बदलून विजय दास असे ठेवले. तो एका हाऊसकीपिंग एजन्सीमध्ये काम करायचो. या आरोपीने सैफवर हल्ला केला होता की नाही याबद्दल पोलिसांनी स्पष्ट उत्तर दिले नाही. शेवटी पोलिसांनी सांगितले की, तपास सुरू आहे.

## एरिट्रियाचा बर्हान टेस्फे मुंबई मॅरेथॉनचा विजेता

- महिला एलिट गटात केनियाच्या टेलीची बाजी
- गतविजेता बर्हानू सहाव्या स्थानी

प्रतिनिधी

**मुंबई**

एरिट्रियाचा बर्हान टेस्फे हा 20व्या टाटा मुंबई मॅरेथॉनचा विजेता ठरला. महिला एलिट गटात केनियाच्या जॉयस चेपकेमोई टेलीने बाजी मारली. दोघांचे मुंबई मॅरेथॉनमधील हे पहिले विजेतेपद आहे.

यंदाच्या हंगामात इथियोपियाचे धावपटू पिछाडीवर पडले. गतविजेता लेमी बर्हानू सहाव्या स्थानावर फेकला गेला. रविवारी झालेल्या 20व्या टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये टेस्फेने प्रस्तावित 42.195 किमी 2 तास 11 मिनिटे आणि 44 सेकंदांमध्ये पार केले. त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील पूर्ण मॅरेथॉनवरील हे पहिलेवहिले




विजेतेपद आहे. एलिट पुरुष गटातील पहिले विजेते एरिट्रियाचे आहेत. टेस्फेचा देशबांधव मेरहावी केसेटेने 2:11:50 सेकंद अशा वेळेसह दुसरा तर इथिओपियाचा टेस्फेय डेमेके (2:11:56 सेकंद) तिसरे स्थान मिळवले. टेस्फे आणि केसेटेमध्ये सुरुवातीपासून प्रचंड चुरस पाहायला मिळाली.

पान 5 वर

## दिल्लीकरांनी हिंसक निवडणूक प्रचार कधीच पाहिला नाही - केजरीवाल

### कालचा हल्ला प्राणघातक असल्याचा केजरीवालांचा भाजपवर आरोप

**नवी दिल्ली**

माझ्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा काल प्रयत्न झाला, असा निवडणूक प्रचार दिल्लीने कधीच पाहिला नाही, असा दावा अरविंद केजरीवाल यांनी रविवारी केला.

केजरीवाल म्हणाले की, माझे जीवन देशासाठी समर्पित आहे. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार प्रवेश वर्मा यांच्या समर्थकांनी शनिवारी, मतदारसंघात प्रचारादरम्यान केजरीवालांवर हल्ला केल्याचा आरोप ‘आप’ने केला आहे. केजरीवाल म्हणाले की, प्राणघातक हल्ला करणे, हा त्यांचा प्रचार करण्याचा मार्ग आहे. कारण ते पराभूत होत आहेत, असे केजरीवाल यांनी भाजपवर निशाणा साधला. भाजपचे नवी दिल्ली विधानसभेचे उमेदवार प्रवेश वर्मा यांनी हल्ल्याबाबत ‘आप’वर बनावट कथा रचल्याचा आरोप केला.

### भारतीय संघ या स्पर्धेत एकही सामना हरला नाही...

# खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला विजयी

### फायनलमध्ये नेपाळचा 78-40 असा पराभव

प्रतिनिधी

**नवी दिल्ली**

भारतीय महिला संघाने खो-खोचा पहिला विश्वचषक जिंकला आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम, नवी दिल्ली येथे झाला. भारताने नेपाळचा 78-40 अशा मोठ्या फरकाने पराभव करत विजेतेपदावर कब्जा केला.

खो-खो विश्वचषक 13 ते 19 जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे खेळला गेला. भारतीय संघ या स्पर्धेत अपराजित राहिला, तर



नेपाळला अंतिम फेरीतच पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. पुरुषांच्या टीम इंडियानेही अंतिम फेरी गाठली असून, त्यांचा सामना नेपाळशी आहे.

भारताने पाठलाग करून सुरुवात केली महिला खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीला रविवारी सायंकाळी सहा वाजता सुरुवात झाली. नेपाळने नाणेफेक जिंकून बचावाचा निर्णय घेतला. भारताने पहिल्या डावात एकतर्फी वर्चस्व दाखवत 34 गुण मिळवले. दुसऱ्या डावात नेपाळने पाठलाग करत 24 गुण गोळा केले, या टर्नवर भारतालाही एक गुण मिळाला. अर्ध्या वेळेनंतर भारताने 35-24 अशा फरकाने आघाडी कायम ठेवली.

चारही डावात भारताचे वर्चस्व दिसून आले तिसऱ्या डावात भारताने आघाडी आणखी वाढवली. या टर्नवर संघाने 38 गुण मिळवले आणि गुण 73-24 असा आपल्या नावे केला. चौथ्या आणि शेवटच्या डावात नेपाळला केवळ 16 गुण करता आले, तर भारताचे 5 गुण झाले.

पान 5 वर

### म ह त्वा चे

## विदर्भात संत्रा प्रक्रिया उद्योगाची गरज : गडकरी



**नागपूर :** संपूर्ण देशात ‘ऑरेंज सिटी’ अशी नागपूरची ओळख आहे. येथील ऑरेंज बर्फी देशात, परदेशात जावी, यासाठी मी खूप आग्रही आहे. नागपुरात होत असलेल्या मदर डेअरीच्या मेगा मॅन्युफॅक्चरिंग प्लान्टच्या माध्यमातून हा उद्देश पूर्ण होईल. अशाप्रकारच्या व्हॅल्यू एडिशन्स खूप महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी संत्रा प्रक्रिया उद्योग निर्माण होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. रामदासपेठ येथील हॉटेल सेंटर पॉईंटमध्ये वनस्पती आरोग्य व्यवस्थापनावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. इंडियन फायटोपॅथॉलॉजिकल सोसायटी आणि केंद्रीय लिंबुवर्गीय संशोधन संस्थान (सीआयसीआर) यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली. ‘कापूस, संत्रा ही विदर्भाची मुख्य पिके आहेत. प्रत्येक क्षेत्रात, विशेषतः उद्योग क्षेत्रात तंत्रज्ञान, बाजारपेठ महत्त्वाचे असते. स्पेनमध्ये ऑरेंज ऑर्कीड आहे. याठिकाणी एका एकराला 30 टन संत्र्याचे उत्पादन आहे. तर आपल्याकडे एकरी 12 ते 15 टन उत्पादन आहे. त्यात गुणवत्ता सुधारण्याचीही गरज आहे. त्यादृष्टीने आयसीएआर चांगले काम करत आहे. ऑरेंज ऑर्किड विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत यावर गडकरी यांनी भर दिला. आयसीएआरने वेगवेगळ्या संस्थांच्या नर्सरी सोबत घेण्याची त्यासाठी प्लान्ट पॅथॉलॉजी स्थापन होण्याची गरज आहे, याचाही गडकरी यांनी आवर्जून उल्लेख केला.

## नागपुरात तणाव रा. स्व. संघाविरोधात युवक कॉंग्रेस आक्रमक

**नागपूर :** कॉंग्रेस युवक आघाडीचे कार्यकर्ते आज राष्ट्रीय स्वंयसवेक संघाच्या कार्यालयावर चालून करुन जाण्याच्या तयारीत होते. संघाचे प्रमुख मोहन भागवत यांच्याविरोधात युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. मोहन भागवतांनी केलेल्या एका वक्तव्याचा विरोध करत युवक कॉंग्रेसने आज नागपूरमध्ये आंदोलन केले. युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते संघ कार्यालयाकडे जात असताना पोलिसांनी आंदोलकांना अडवले आणि ताब्यात घेतले. अयोध्येत राममंदिर उभे राहिले, तेव्हा देश खऱ्या अर्थाने मुक्त झाला, असे वक्तव्य राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे प्रमुख डॉ. मोहन भागवतांनी मध्यप्रदेशातील एका कार्यक्रमात केले होते. त्यांच्या या वक्तव्याविरोधात नागपुरात आज युवक कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेतली. युवक कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू यांच्या नेतृत्वात नागपूरमधील देवडिया कॉंग्रेस भवनमधून आंदोलनाला सुरुवात झाली. कॉंग्रेस भवनमधून युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते संघ कार्यालयाच्या दिशेने निघाले. संघाने आधी ध्वजाचा अवमान केला. आता स्वातंत्र्याचा अपमान करत आहेत, असे बॅनर्स घेऊन कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. यावेळी संघावर बंदी घाला, अशी मागणी युवक कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी केली.

## रस्त्यात उभारलेल्या रिक्षा थांब्यांचा नागरिकांना त्रास

**विरार :** वसई -विरार शहरातील मुख्य रस्त्यावर अवैधरित्या रिक्षा थांबे उभारले गेले आहेत. या उभारलेल्या रिक्षा स्थानकांमुळे रस्ते आखूड झाले असून शहरातील वाहतूक कोंडीत दिवसागणिक भर पडली आहे. अशा अवैध रस्त्यात उभारलेल्या रिक्षा स्थानकांवर पोलीस कार्यवाही करत नसल्यामुळे शहरातील रस्त्यावर शेकडो थांबे उभे राहिले आहेत. यामुळे तासनतास वाहनांची वाहतूक कोंडी होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना याचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे. अशा रिक्षा स्थानकांवर पोलिसांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे. वसई- विरार शहरात मुख्य वर्दळीच्या रत्यांवर रिक्षा स्थानक मोठ्या प्रमाणात उभे राहिले आहेत. या रिक्षा स्थानकामुळे आठ फुटांचे रस्ते चार फुटांवर आले आहेत. त्यामध्ये रिक्षा चालक रस्त्यात रिक्षांची रांग लावून प्रवाशांची वाट बघत असल्यामुळे शहरात वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण वाढले आहे.



## थोडक्यात

### लाखोंच्या घरफोडीप्रकरणी आरोपी अखेर अटकेत

**वसई:** नाळा गावातील पडई येथे झालेली लाखोंची घरफोडी रिक्षाच्या नंबर प्लेटवरून उघडकीस आली आहे. या आरोपींनी जेलमध्ये असताना या गुन्ह्याचा प्लॅन आखल्याची माहितीही त्यांनी दिली. आरोपीकडून १५० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले असून फरार एक आरोपी आणि ज्वेलर्स मालकाचा पोलीस शोध घेत तपास करत आहे. नाळा गावातील पडई परिसरात राहणारे दिव्येश म्हात्रे (२५) यांच्या बंगल्यात ८ जुलैला दिवसाढवळ्या लाखोंची घरफोडी झाली. आरोपींनी घराचे लॉक असलेले कडी कोयंडा तोडून बंगल्यात प्रवेश केला. बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटातून २५ लाख ६६ हजारांचे ६२० ग्रॅमचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. नालासोपारा पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला होता. मोठ्या प्रमाणात दागिने चोरी झाल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळी असलेले सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपींचा शोध सुरू केला. आरोपी रिक्षाने आल्याचे सीसीटीव्हीत दिसून आल्याने ८० सीसीटीव्ही तपासले.त्यानंतर रिक्षा तिच्या नंबर प्लेटवरून भिवंडीच्या काल्हेर गावात सापडली.

### डॉक्टरविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**वसई:** वसई- विरार शहरात मागील काही वर्षांपासून डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना याचा नाहक त्रास सहन लागत आहेत. यातच वसईच्या पश्चिमेकडील ब्रेथ केअर रुग्णालयाचा डॉक्टर धर्मेंद्र दुबे याच्याविरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०२४ मध्ये एका रुग्णाच्या उपचारादरम्यान हलगर्जीपणा केल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा चुकीच्या वर्तणुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. पालिका प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन अशा डॉक्टरांच्या विरोधात कारवाई करणे गरजेचे आहे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. डॉ. धर्मेंद्र दुबे याचे वसई पश्चिमेच्या आनंद नगर येथे ब्रेथ केअर रुग्णालय आहे. १८ मार्च २०२३ रोजी रुपेश गुप्ता (२७) या तरुणाला उपचारासाठी आणले होते. या रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे गुप्ताचा मृत्यू झाल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला होता. यावेळी नातेवाईकांनी रुग्णालयातही गोंधळ घातला होता. हे प्रकरण पडताळणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे पाठविण्यात आले होते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# बांगलादेशींच्या विळख्यात वसई -विरार

## दोन दिवसांत आठ बांगलादेशियांची धरपकड


**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार शहरात बेकायदेशीररीत्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मागील दोन दिवसांत पोलिसांनी राबवलेल्या मोहिमेत आठ बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. प्रशासनाने या कारवाया अधिक तीव्र करण्याची तयारी दर्शवली आहे, कारण येथील नागरिकांमध्ये वाढत्या बेकायदेशीर घुसखोरीमुळे अस्वस्थता आहे.

वसई-विरारमध्ये अनेक बांगलादेशी नागरिक चोरीछुप्या मार्गाने दाखल होऊन बेकायदेशीररित्या वास्तव्य करत आहेत. हे लोक मुख्यतः बांधकामे, उद्योगधंदे, फेरीवाले व बाजारपेठांमध्ये कार्यरत आहेत. बंगाली भाषा बोलणाऱ्या या नागरिकांना ओळखणे कठीण ठरत असल्याने त्यांच्यावर नियंत्रण

**बांगलादेशातील परिस्थितीचा परिणाम**

बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांमुळे अनेक बांगलादेशी नागरिकांनी भारतात पलायन केले आहे. वसई-विरार हे परिसर त्यांना लपण्यासाठी आणि स्थायिक होण्यासाठी सोयीचे ठरत असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर रहिवासी तयार झाले आहेत.



**पोलिसांची कारवाई वेगाने सुरू**

मध्यंतरी पोलीस उपायुक्त डॉ. महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली वसई-विरारमध्ये कोंबिंग ऑपरेशन राबवले गेले होते. या मोहिमेमुळे अनेक बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात यश आले होते. आता पुन्हा एकदा पोलिसांनी तीव्र कारवाई सुरू केली आहे. मागील दोन दिवसांत केलेल्या मोहिमेत आठ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

**कोंबिंग ऑपरेशनची गरज**

स्थानिक नागरिकांनी पोलिसांकडे पुन्हा एकदा कडक कोंबिंग ऑपरेशन राबवण्याची मागणी केली आहे. यामुळे बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य उघड होईल आणि वाढत्या घुसखोरीला आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

# महायुतीचे पाच आमदार पण पालकमंत्री बाहेरचा

## पालघरकर संतप्त

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे (भाजप) फारसे प्रभावी अस्तित्व नसतानाही गेल्या काही निवडणुकांमध्ये पक्षाने जोरदार कामगिरी करून जिल्ह्यात आपले बस्तान बसवले आहे. मात्र या यशाचा फायदा स्थानिक नेतृत्वाला देण्याऐवजी भाजपने नवी मुंबईतील गणेश नाईक यांना पालघरचे पालकमंत्री म्हणून नियुक्त केल्याने जिल्ह्यात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

पालघर जिल्हा आदिवासीबहुल असून, येथे अनेक आदिवासी समाजाचे हितसंबंध जपले जातात. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला प्राधान्य देणे अपेक्षित होते. माजी वनमंत्री गणेश नाईक यांना पालघर जिल्ह्याचा अनुभव असल्याचा मुद्दा मांडत त्यांची नेमणूक केली गेली असली, तरी काही जाणकारांच्या मते भाजपने आगामी वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीत हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाला आव्हान देण्यासाठी नाईक यांचा वापर सुरू केला आहे.

**गणेश नाईक यांची नियुक्ती: रणनीती की मजबूरी?**

भाजपने गणेश नाईक यांना पालकमंत्री म्हणून निवडणे, हे राजकीय डावपेच असल्याचे बोलले जाते. आदिवासी भागांवर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर लक्ष केंद्रित करून, पक्षाच्या आगामी योजनांना बळकटी देण्यासाठी नाईक यांना आणल्याचा आरोप केला जात आहे.

**पालघरकर नाराज**

पालघर जिल्ह्याच्या स्थानिक नेत्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. स्थानिक नेतृत्वाचा विकास थांबवून बाहेरच्या नेत्याला प्राधान्य दिल्याने जिल्ह्यातील जनतेतही असंतोष पसरला आहे.

**स्थानिक नेतृत्वाचा विचार का झाला नाही?**

**आमदार स्नेहा दुबे-पंडित:** वसईतील समाजसेवेमुळे ओळख निर्माण करणाऱ्या स्नेहा दुबे यांना पालकमंत्री पदाचा चांगला पर्याय मानले जात होते. मात्र, राजकारणात नवखे असल्याने त्यांचा विचार टाळला गेला, अशी चर्चा आहे.

**राजेंद्र गावित:** सतत पक्षांतर करणारे आणि सध्याच्या शिंदे गटाशी संलग्न असल्यामुळे राजेंद्र गावित यांचा विचार केला गेला नसावा.

**विलास तरे:** तिसऱ्यांदा आमदार झालेल्या विलास तरे यांना अभ्यासू नेते मानले जात नसल्याने त्यांनाही वगळण्यात आले.


# वसईतील पारंपरिक दुग्ध व्यवसाय संकटात

## अतिक्रमण, महागाई आणि परप्रांतीयांचा दबदबा

**प्रतिनिधी**
■ **वसई**

एकेकाळी वसईतील ग्रामीण भाग हा दुग्ध व्यवसायाचा मुख्य केंद्र होता. जवळजवळ प्रत्येक शेतकऱ्याकडे गाई-म्हशींचे कळप असायचे. याच पशुपालनातून त्यांचे आर्थिक चक्र फिरत असे. दूध, दही, ताक आणि लोण्याची विक्री करून शेतकरी स्वतःच्या गरजा भागवत आणि अतिरिक्त उत्पन्नही मिळवत. मात्र, गेल्या काही दशकांपासून परिस्थिती पूर्णतः बदललेली दिसून येते.

शेतकरी वर्गासाठी दुग्ध व्यवसाय हा शेतीला जोडून घेतला जाणारा एक महत्त्वाचा व्यवसाय होता. मात्र, आधुनिक यांत्रिकीकरण, शेतीच्या पारंपरिक पद्धतींना ओहोटी, आणि जनावरांच्या देखभालीतील वाढता खर्च यामुळे दुग्ध व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. याशिवाय, मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याने चराई क्षेत्र घटले आहे. परिणामी, वैरण महाग झाल्याने पशुपालन परवडत नाही.सध्या वसईतील दुग्ध व्यवसाय स्थानिक शेतकऱ्यांच्या हातातून निसटून परप्रांतीयांच्या हातात गेला आहे. मोठ्या तबेल्यांचे आणि आधुनिक दुध उत्पादन यंत्रणांचे उदय होत असल्याने स्थानिक दुग्ध व्यवसाय संकटात सापडला आहे. देशी जनावरे कमी उत्पादनक्षम असल्याने संकरीत जनावरे खरेदी करण्याची गरज भासते. मात्र, त्यांचा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही. शासनाच्या उदासीन धोरणांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित अनुदान किंवा योग्य दूधदर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा व्यवसाय तोट्यात जात आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. दुग्ध व्यवसायाला पाठबळ देण्यासाठी शासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत.



### तुरुंगात मैत्री, नालासोपाऱ्यात चोरी

**वसई:** नालासोपारा पश्चिमेच्या नाळे गावात झालेल्या २५ लाखांच्या दागिन्यांच्या चोरीचा छडा तब्बल ६ महिन्यांनी लावण्यात नालासोपारा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे. या प्रकरणातील ३ आरोपींना भिवंडी, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथून अटक केली आहे. या चोरीचा छडा लावणे पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले होते. नाळे गावातील दिव्येश म्हात्रे यांच्या घरात ८ जुलै २००४ रोजी चोरी झाली होती. अज्ञात चोरांनी घरातील ६२० ग्रॅम वजनाचे सुमारे २५ लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले होते. गावात झालेल्या या चोरीने बरीच खळबळ उडाली होती. नालासोपारा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने या प्रकरणी तपास सुरू केला होता.

# वणव्यात 25 काजू झाडे जळून खाक

**प्रतिनिधी**
■ **मोखाडा**

मोखाडा तालुक्यातील खोच येथे काशिनाथ रामा पाटील यांच्या काजू बागेत वणवा लागून यात सुमारे २५ ते ३० काजूची झाडे जळून राख झाली आहेत.शुक्रवारी रात्री ९:३०ते १०.००वाजता ही घटना घडली. पाटील यांच्या घरापासून ५००मीटर अंतरावर असलेल्या काजू झाडांच्या बागेतून आगीचे लोळ दिसू लागल्याने लोकांनी त्या ठिकाणी धाव घेतली.बागेत गवत असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. बागेत सुके गवत वाढले असल्याने आगीचा भडका उडाला. पाटील यांनी काजू कलमे लावून ते वाढवण्यासाठी खूप कष्ट घेतले होते.ही झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने त्यांच्या मेहनतीवर पाणी पडले आहे.



रौद्ररूप धारण केलेल्या आगीपुढे विझवणाऱ्यांची मेहनत कमी पडत होती;मात्र तरीही मागे-पुढे न पाहता पुढील होणारे नुकसान टाळण्यासाठी आगीवर नियंत्रण आणण्यात त्यांना यश आले अन्यथा आजबाजूच्या शेतात आगीची झळ पोचली असती.आग कशामुळे लागली,याचे कारण समजलेले नाही.या आगीत दरवर्षी पीक देणारी काजू झाडे व नवीन काजुरोपे जळून खाक झाली आहेत.याची माहिती तलाठी बिन्नर यांना कळविली असता पंचनामा सोमवारी करू असे आश्वासन दिले. दोघेही प्रशासनाकडे बाजारांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करत आहेत.ग्रामीण भागांतील बाजारांना सुस्थितीत आणण्यासाठी प्रशासनाने विशेष संपर्क प्रकल्प राबवून मोकळया जागांची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

# मोख्या चापाडा ते फणसपाडा मंजूर रस्ताचे काम चालू करा, ग्रामस्थांनी मागणी

**प्रतिनिधी**
■ **जव्हार**

जव्हार तालुक्यातील मोख्या चापाडा ते फणस पाडा हा रस्ता मंजूर झाला असून काम चालू होत नाही म्हणून सामाजिक कार्यकर्ते केशव टोकरे व गावातील ग्रामस्थांनी मिळून सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार यांना काम चालू करण्यासाठी मागणी करीत आहेत .

मोख्या चापाडा ते फणस पाडा अक्षरशः रस्त्याची चाळण झाली आहे आणि रोजच जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो तसेच रस्ता अतिशय खराब असल्यामुळे आजपर्यंत अनेक वाहन चालक दुचाकीवरून घसरून पडत असून कित्येक जन्नाचे हात पायांना दुखापत होऊन त्यांची आर्थिक नुकसान होत आहे. तसेच गरोदर स्त्रियांना त्रास सहन, तालुक्याच्या ठिकाणी कामानिमित्त जाणाऱ्यांना नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.तसेच काही महिलांची रस्ते मध्ये प्रसूती झाली आहे. एकीकडे रस्ता खराब असल्यामुळे गरोदर एसटी बस बंद करण्यात आली आणि एकीकडे आरोग्य केंद्रात कोणतेही वाहन नसल्यामुळे त खाजगी वाहन शोधावी लागतात व ती पण वेळेवर मिळत नाही आणि त्यांचे भाडे पण परवडत नाही म्हणून गरोदर स्त्रियांना नाहक वेदना सहन कराव्या लागतात,तसेच या भागतील नागरिकांना तालुकापर्यंत पोहचण्यासाठी लागतोय एक तास वेळेअभावी काही काम असल्यास माराव्या लागतात तीन,चार चकरा तसेच या भागातील शिक्षक,अंगणवाडी, आशा सेविका यांना ये जा करणे झाले कठीण.



तरी तात्काळ ठेकेदाराकडून रस्त्याचे काम आठवड्याभरात काम चालू करण्यात यावे अन्यथा आपल्या ऑफिसला घेराव घालून आंदोलन करण्याचा इशारा या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक बोलत आहेत.

# 'कनेक्शन इंडिया फेस्टिव्हल'मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहा शाळांची निवड

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच कलेची, नाटकाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी नरिमन पॉईंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् (एनसीपीए) तर्फे 'कनेक्शन इंडिया फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये मुंबईतील १६ शाळांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहा शाळांचा समावेश आहे. या निमित्ताने महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आतापासूनच रंगमंचाची ओळख होणार आहे. या फेस्टिव्हलमध्ये या १६ शाळांसह मुंबईतील महाविद्यालये, सेवाभावी संस्था देखील सहभागी होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे या फेस्टिव्हलमध्ये यूके येथील नॅशनल थिएटरदेखील सहभागी झाले आहे.

नरिमन पॉईंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् (एनसीपीए) तर्फे नाट्यसृष्टीशी निगडित विविध महोत्सव, कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते. यंदा 'एनसीपीए'मध्ये दिनांक १६ जानेवारी २०२५ पासून १९ जानेवारी २०२५ तसेच २३ जानेवारी २०२५ ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत 'कनेक्शन इंडिया फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये मुंबईतील १६ शाळांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये पाच सेवाभावी विविध संस्था, पाच खासगी शाळांबरोबरच महानगरपालिकेच्या सहा शाळांचे विद्यार्थी कलागुण सादर करणार आहेत.

या फेस्टिव्हलमध्ये गुरूवारी महानगरपालिकेच्या मालाड पी उत्तर विभागातील गोविंदनगर मुंबई पब्लिक स्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'बॅक इन द डे' हा कार्यक्रम सादर केला. तसेच शनिवारी के पश्चिम विभागातील डी. एन. नगर मुंबई पब्लिक स्कूल शाळेचे विद्यार्थी 'पूरवैय्या', १९ जानेवारी रोजी एफ दक्षिण विभागातील अभ्युदय नगर मुंबई पब्लिक शाळेचे विद्यार्थी 'सुपरग्ल्यू', २३ जानेवारी रोजी जी दक्षिण विभागातील सीताराम मील कंपाऊंड मुंबई पब्लिक शाळेचे विद्यार्थी 'एपिक', २४ जानेवारी रोजी पी उत्तर विभागातील चिंचवली मुंबई पब्लिक शाळेचे विद्यार्थी 'रिमोट' आणि द २६ जानेवारी रोजी एच पूर्व विभागातील खेरवाडी मुंबई पब्लिक शाळेचे विद्यार्थी 'एज इज रिव्होल्टिंग' हा कार्यक्रम सादर करणार आहेत.

या नाटकांतून सुख-दु:खाच्या रंगछटांसह यश आणि वातावरण बदल आदी विषयांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. नाटकांचे दिग्दर्शन कसे करावे, नेपथ्याची मांडणी, कलागुणांना वाव देणे, सांघिक प्रयत्न आणि उत्तम सादरीकरण आदी विषय विद्यार्थ्यांना या फेस्टिव्हलमध्ये शिकायला मिळणार आहेत. तसेच ही नाटकं पाहण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील ५० विद्यार्थ्यांना दररोज विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे.


# "स्वामित्व" योजनेंतर्गत गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम संपन्न

## स्वामित्व योजनेतून ग्रामस्थ आर्थिक दृष्ट्या सक्षम होणार मदत

**प्रतिनिधी**
■ **पालघर**

गावकऱ्यांना त्यांच्या जमिन मालकीचे प्रमाणपत्र मिळवणे सोपे होणार आहे. यापूर्वी जमिनीच्या कागदपत्रा संबंधित वाद आणि विलंब होत होते, पण या योजनेमुळे ग्रामस्थांना त्यांचे प्रॉपर्टी कार्ड प्राप्त होणार असून यामुळे ग्रामीण पातळीवर आर्थिक प्रगती होऊन ग्रामस्थ आर्थिक दृष्ट्या सक्षम होणार असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले .

"स्वामित्व" योजनेंतर्गत गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष ,खासदार , आमदार , जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक ,अप्पर जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,निवासी उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी आणि लाभार्थी उपस्थित होते



या योजनेमुळे बँक कर्ज घेण्याची प्रक्रिया देखील सुलभ होणार असून, बँकांना स्पष्ट मालमत्ता कागदपत्रे मिळाल्याने बँकांना देखील कर्ज देणे अधिक सुरक्षित होईल. स्वामित्व योजना अंतर्गत पालघर जिल्ह्यातील 60% कामे पूर्ण झाली असून लवकरच संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. हि योजना यशस्वी राबवणीत पालघर जिल्हा प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. जिल्हा प्रशासनाने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली असून भविष्यात ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक आर्थिकदृष्ट्या सशक्त आणि स्वावलंबी बनवण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असल्याचे वने मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 211
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - २११
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## मालाड मस्तीमध्ये राघव जुयाल, रश्मी देसाई, शारिब हाशमी, एमीवे बंटाई यांची उपस्थिती

**मुंबई:-** मालाड मस्ती 2025 हा कार्यक्रम अत्यंत खास आणि मनोरंजनाने बहरला आहे. जिथे बॉलिवूड, टीव्ही आणि संगीत क्षेत्रातील अनेक सिताऱ्यांनी आपल्या उपस्थितीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आमदार असलम शेख यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात मनोरंजन आणि मस्तीचा एक अनोखा संगम पाहायला मिळत आहे. डान्सर आणि अभिनेता राघव जुयालने आपल्या खोडकर कृतींनी आणि पब्लिकशी संवाद साधून कार्यक्रमाला ऊर्जा दिली. त्यांनी आपले सीनियर आणि प्रेरणास्थान शारिब हाशमी यांची प्रशंसा केली आणि त्यांच्या संगी चित्रपटाचा प्रचार केला, शारिब हाशमी यांनी मलाड मस्ती च्या यशस्वी आयोजनाबद्दल असलम शेख यांचे कौतुक केले आणि सांगितले की, ते गेल्या आठ वर्षांपासून या कार्यक्रमाचा भाग आहेत.टीव्ही क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्री रश्मी देसाई यांनी आपला आगामी गुजराती चित्रपट प्रमोट केला, तर ईशा मालवीय यांनी आपल्या शोबद्दल काही मजेशीर किस्से सांगितले.



# ड्रेसिंग रूममधल्या गोष्टी तिथेच सोडून द्यायच्या असतात ...

## मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा रोहित शर्माला टोला

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या वानखेडे स्टेडियमला 50 वर्षे पूर्ण झाली आहेत, आणि या खास वर्धापनदिनानिमित्त एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबई क्रिकेटच्या इतिहासात या स्टेडियमचा महत्त्वपूर्ण वाटा असताना, आज या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वानखेडे स्टेडियममध्ये विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले. यावेळी क्रिकेटच्या दिग्गज खेळाडूंनी, जसे की सुनील गावस्कर, सचिन तेंडूलकर, रवी शास्त्री, कर्णधार रोहित शर्मा आणि अजिंक्य रहाणे यांनी आपले अनुभव व्यक्त केले. याशिवाय, राजकीय क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनाही उपस्थिती होती, ज्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि भाजप नेते आशिष शेलार देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमात सचिन तेंडूलकरने अप्रत्यक्षपणे कर्णधार रोहित शर्मा याला शाब्दिक टोला लगावल्याची चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी खेळवलेल्या



बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता, आणि त्यावेळी टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये काही वाद झाले असल्याचे समोर आले होते. कर्णधार रोहित शर्मा याने या वादग्रस्त बाबी मीडिया समोर उघड केल्या होत्या. आजच्या कार्यक्रमात सचिनने वडापावचा एक किस्सा सांगताना रोहित शर्मा याला टोला दिला, आणि या शाब्दिक टोल्याची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे.

सचिन तेंडुलकर म्हणाला, आमच्या ड्रेसिंग रुममधील एका खेळाडूची सवय होती, त्याला म्हटले की तू बॉलिंग करणार आहे. तर तो ड्रेसिंग रुममध्ये जाऊन बुट घालायचा. कधी बॅटिंगला जायला सांगितले तर डब्यातून काही खायचा. मात्र, ऐकेदिवशी आमच्या टीममधील दोन खोडकर मुलांनी ड्रेसिंग रुममध्ये गेले आणि त्याचा डब्बा खाल्ला. त्याच्या डब्यातील सगळे वडापाव खाल्ले. त्यानंतर तो प्लेअर पॅड घालण्यासाठी ड्रेसिंग रुममध्ये गेला, तेव्हा त्याला डब्बा मोकळा दिसला. मग तो रागात बाहेर आला. सर्वांना विचारू लागला माझा डब्बा कोणी खाल्ला? त्याने दंगा सुरु केला. प्रॅक्टिस थांबवा. डब्बा कोणी खाल्ला त्याचं पोट खराब होईल, असे म्हणाला. तो अर्धातास ओरडत होता. मात्र, नाव कोणीही सांगितले नाही. या गोष्टीला तीस वर्षे उलटले पण ते आम्ही सांगितले नाही. आम्ही भेटल्यावर त्यावर चर्चा होते. पण आजवर आम्ही ते कोणालाही सांगितलं नाही. ड्रेसिंग रुममधील गोष्टी ड्रेसिंग रुममध्येच ठेवले. मी आताही हे सांगणार नाही, असे म्हणत सचिनने रोहित शर्माला मिश्किल टोला लगावला आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या वानखेडे स्टेडियमला 50 वर्षे पूर्ण झाली आहेत, आणि या खास वर्धापनदिनानिमित्त एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबई क्रिकेटच्या इतिहासात या स्टेडियमचा महत्त्वपूर्ण वाटा असताना, आज या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वानखेडे स्टेडियममध्ये विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले. यावेळी क्रिकेटच्या दिग्गज खेळाडूंनी, जसे की सुनील गावस्कर, सचिन तेंडूलकर, रवी शास्त्री, कर्णधार रोहित शर्मा आणि अजिंक्य रहाणे यांनी आपले अनुभव व्यक्त केले. याशिवाय, राजकीय क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनाही उपस्थिती होती, ज्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि भाजप नेते आशिष शेलार देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमात सचिन तेंडूलकरने अप्रत्यक्षपणे कर्णधार रोहित शर्मा याला शाब्दिक टोला लगावल्याची चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी खेळवलेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता, आणि त्यावेळी टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये काही वाद झाले असल्याचे समोर आले होते. कर्णधार रोहित शर्मा याने या वादग्रस्त बाबी मीडिया समोर उघड केल्या होत्या. आजच्या कार्यक्रमात सचिनने वडापावचा एक किस्सा सांगताना रोहित शर्मा याला टोला दिला, आणि या शाब्दिक टोल्याची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे.

सचिन तेंडुलकर म्हणाला, आमच्या ड्रेसिंग रुममधील एका खेळाडूची सवय होती, त्याला म्हटले की तू बॉलिंग करणार आहे. तर तो ड्रेसिंग रुममध्ये जाऊन बुट घालायचा. कधी बॅटिंगला जायला सांगितले तर डब्यातून काही खायचा. मात्र, ऐकेदिवशी आमच्या टीममधील दोन खोडकर मुलांनी ड्रेसिंग रुममध्ये गेले आणि त्याचा डब्बा खाल्ला. त्याच्या डब्यातील सगळे वडापाव खाल्ले. त्यानंतर तो प्लेअर पॅड घालण्यासाठी ड्रेसिंग रुममध्ये गेला, तेव्हा त्याला डब्बा मोकळा दिसला. मग तो रागात बाहेर आला. सर्वांना विचारू लागला माझा डब्बा कोणी खाल्ला? त्याने दंगा सुरु केला. प्रॅक्टिस थांबवा. डब्बा कोणी खाल्ला त्याचं पोट खराब होईल, असे म्हणाला. तो अर्धातास ओरडत होता. मात्र, नाव कोणीही सांगितले नाही. या गोष्टीला तीस वर्षे उलटले पण ते आम्ही सांगितले नाही. आम्ही भेटल्यावर त्यावर चर्चा होते. पण आजवर आम्ही ते कोणालाही सांगितलं नाही. ड्रेसिंग रुममधील गोष्टी ड्रेसिंग रुममध्येच ठेवले. मी आताही हे सांगणार नाही, असे म्हणत सचिनने रोहित शर्माला मिश्किल टोला लगावला आहे.

# पंतप्रधान मोदींनी केले कीर्तिकर कुटुंबियांचे सांत्वन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवसेना ज्येष्ठ नेते, माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या पत्नी कै. मेघना कीर्तिकर यांचे दिनांक ५ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गजानन कीर्तिकर यांना शोकसंदेश पाठवून कै. मेघना कीर्तिकर यांच्या निधनाबद्धल शोक व्यक्त केला. २०१४ ते २०२४ पर्यंत संसदेत खासदार असलेल्या कीर्तिकर यांचा पंतप्रधानांशी ऋणानुबंध होता. कै. मेघना यांनी दिलेले संस्कार आपल्या परिवाराला सतत मार्गदर्शन करतील. या शोकाकूल परिस्थितीत दुःख सहन करण्याची शक्ति आपल्याला ईश्वर देवो असे पंतप्रधानांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे. तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील गजानन कीर्तिकर यांना शोकसंदेश पाठवून कै. मेघना कीर्तिकर यांच्या निधनाबद्धल शोक व्यक्त केला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, उपसभापती निलम गो-हे, शिवसेना नेते सुभाष देसाई, शिवसेना नेते खासदार संजय राऊत, शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, खासदार अनिल देसाई, माजी मंत्री दिपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार रविंद्र वायकर, खासदार श्रीरंगअप्पा बारणे, खासदार संजय दिना पाटील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम, माजी खासदार आनंदराव अडसुळ, शिवसेना नेते विनायक राऊत, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आमदार विद्या जयप्रकाश ठाकूर, आमदार सुनिल प्रभु, आमदार मिलींद नार्वेकर, आमदार सुनील शिंदे, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार अनंत नर,आमदार अतुल भातखळकर, आमदार राजहंस सिंह, माजी खासदार राहुल शेवाळे, माजी आमदार विनोद घोसाळकर, माजी आमदार विलास पोतनीस, माजी आमदार बलदेव खोसा, माजी आमदार अशोकभाऊ जाधव, माजी आमदार अभिजीत अडसूळ, माजी आरोग्य मंत्री डॉ. दिपक सावंत, माजी आमदार शिवाजी चोथे, माजी आमदार शिवराम दळवी, मिनाताई ठाकरे वृध्दाश्रमचे अध्यक्ष चंदूमामा वैद्य, शिवसेना सचिव संजय मोरे, भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी जयप्रकाश ठाकूर, चिल्ड्रन वेल्फेअर सेंटरचे प्राचार्य अजय कौल, भाजपाचे माजी नगरसेवक दिलीप पटेल, शिवसेना संघटक अशोक तिवारी, उद्योगपती अनिल मुरारका, शिवसेना प्रवक्ते आनंद दुबे, बॉडी बिल्डिंग संघटनेचे पदाधिकारी सुनील शेडगे, ज्येष्ठ सिनेअभिनेते जयवंत वाडकर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष क्लाईव्ह डायस, पुण्याचे राहुल कलाटे, पत्रकार व कामगार नेते अभिजित राणे, शिवछत्रपती पदक विजेती कब्बडीपटू कोमल देवकर, कॉंग्रेसचे माजी नगरसेवक नानू सोडा यांनी कीर्तिकर कुटुंबियांचे सांत्वन केले.

# शिवाजी पार्कच्या धुळीवर जलफवारणी, गवताचा उतारा, मैदानावरील माती न काढण्याची आयआयटीची सूचना

## स्थानिक क्लब्स माती दाबून त्यावर सतत पाणी फवारणीस मदत करण्यास तयार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

दादरच्या शिवाजी पार्क मैदानातील माती वाऱ्यामुळे उडून धूळ प्रदूषण होत असल्याबद्दल आयआयटीने मुंबई महापालिकेकडे अहवाल सादर केला आहे. त्यात मैदानातील माती न काढता त्यावर पाणी मारून रोलरद्वारे सपाटीकरण करण्याचा पर्याय देण्यात आला आहे. शिवाय, गवतरोपण करण्यात येणार असून, सहा महिन्यांत टप्प्याटप्प्याने ही कामे करण्यात येतील.मात्र स्थायिक दादरकरांनी आयआयटीच्या या उपाययोजनेबद्दल नापसंती व्यक्त केली आहे.



छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानात अनेक खेळपट्ट्या असून, क्रिकेटच्या सरावासह सामनेही होतात. फेरफटका मारण्यासाठी शिवाजी पार्कमध्ये मोठी वर्दळ असते. मैदानातील हिरवळ कायम राहावी, धूळ उडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने शिवाजी पार्कचे नूतनीकरण करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने आठ- नऊ वर्षांपूर्वी घेतला होता. त्यासाठी मैदानावर मोठ्या प्रमाणात लाल माती टाकण्यात आली होती. मातीवर पाण्याची फवारणी करणे आणि हिरवळ फुलवण्यासाठीही पाण्याची गरज असल्याने पावसाचे पाणी साठवण्यासाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' प्रकल्प उभारण्यात आला. मात्र, तो प्रत्यक्षात कार्यान्वितच झाला नाही. त्यामुळे मैदानातील माती उडून रहिवाशांना धूळ प्रदूषणाचा त्रास होतो.

धूळ प्रदूषणमुक्तीसाठी 'स्मॉग टॉवर' बसवण्याची संकल्पना समोर आली होती. शिवाजी पार्कात आठ 'स्मॉग टॉवर' बसवण्याचा महापालिकेचा विचार होता. मात्र, ही संकल्पना मागे पडली. शिवाजी पार्कमधील धूळ प्रदूषण रोखण्यासाठी मैदानातील हवेत उडणारी माती व्हॅक्युमच्या सहाय्याने ट्रकमध्ये जमा करण्याचे कामही हाती घेण्यात आले. कालांतराने हे कामही थांबवण्यात आले. प्रदूषण रोखण्यासाठी मैदानातील सहा ते नऊ इंचापर्यंतची माती 'जेसीबी'च्या मदतीने काढण्यात येणार होती. माती काढल्यानंतर पाणी फवारणी करून त्यावरून रोलर फिरवून मैदानातील उर्वरीत माती सपाट करण्याचा प्रस्ताव होता. मात्र, आयआयटीच्या अभ्यास अहवालानंतरच हा निर्णय घेतला जाईल, असे महापालिकेने स्पष्ट केले होते.

आयआयटीचा अहवाल सादर झाल्याची माहिती मुंबई महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. यामध्ये माती न काढण्याची सूचना करण्यात आली आहे. माती न काढता त्यावर पाणी मारून रोलिंग केले जाणार आहे. त्यामुळे माती आणखी खाली बसेल. त्यानंतर मैदानात ज्या भागांतून माती हवेत उडून प्रदूषण होते, त्या-त्या भागात गवतरोपण करण्यात येणार आहे. त्यामुळे माती उडणार नाही. सहा महिन्यांत टप्प्याटप्प्याने ही कामे सुरू राहणार आहेत.आयआयटीकडून असा अहवाल अपेक्षित नाही. हा तांत्रिक मुद्दा नसून, हा विषयही आयआयटीचा नव्हता. त्यामुळे आयआयटीने दिलेल्या अहवालातून प्रदूषणुक्त शिवाजी पार्क होणार नाही,असे मत प्रकाश बेलवाडे, शिवाजी पार्क सिटिझन्स फोरमचे सदस्य यांनी व्यक्त केले आहे.

*'शिवाजी पार्क मैदानातील धुळीच्या समस्येवर एकाच रामबाण उपाय म्हणजे मैदानातील मातीवर सतत पाणी मारून ती रोलरने दाबून समतल कार्याला हवी. मात्र त्यासाठी महानगरपालिकेने पाणी उपलब्ध करून दिल्यास स्थानिक क्लब ते सेवाभावी कार्य प्रभावीपणे करू शकतील. या मैदानात अनेक बोअर वेल्स असून त्यातून पालिका सहज मैदानाला पाणी उपलब्ध करून देऊ शकते.मैदान पूर्ण खणून माती काढणे आणि समतल करणे हा या समस्येवरचा उपाय ठरू शकता नाही.स्थानिक क्लब्सच्या प्रतिनिधींनी आपले हे मत पालिकेच्या वॉर्ड ऑफिसर्सना अगोदरच कळवले आहे.*

***- महेश श्रीधर शेट्ये, कोषाध्यक्ष माहीम जुवेनाईल क्लब, दादर***



## श्रीमती शहाबाई सरतापे यांचे निधन

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे प्रसिध्दीप्रमुख व आरटीओ कर्मचारी संघटनेचे सरचिणीस सुरेंद्र सरतापे यांना आज मातृशोक झाला. त्यांच्या मातोश्री श्रीमती शहाबाई ज्ञानदेव सरतापे यांचे वयाच्या 95 व्या वर्षी रविवारी 19 जानेवारी रोजी संध्याकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे विवाहित दोन मुले, विवाहित मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

**परिशिष्ट क्रमांक 16**
**( उपविधी क्रमांक 34 अन्वये )**

**नोटीस**

परेल शिवसंदेश सी.एच.एस. लि.कस्तुरबा गांधी नगर, दैनिक शिवनेर मार्ग, वरळी,मुंबई: 400018, या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या इमारतीत 2/307, धारण करणारे कै.विठ्ठल ज्योती कांबळे यांचे दि.11/07/2020 रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटीसीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून 07 दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या पृष्टार्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तींकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदांचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्यात येईल.नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सकाळी 11ते संध्याकाळी 06 पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**परेल शिवसंदेश को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी**

**ठिकाण:वरळी, मुंबई**
**दिनांक:20/01/2025**

# "ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ"ला मिळाला स्वामीभक्तांचा उस्फूर्त प्रतिसाद



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

"देव्हारा" नागपूर निर्माते शशिकांत डहाके व ज्योती डहाके या नाट्यसंस्थेतर्फे दि,१६ व दि,१७ रोजी यशवंत नाट्य संकुल माटुंगा येथे सादर झालेला "ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ" या सादरीकरणाला स्वामी भक्तांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुंबईतील हा पहिलाच प्रयोग होता.

श्री स्वामी समर्थांच्या जीवन प्रवाहाची गाथा स्वामी वरुळातून प्रकटीकरण पासून ते देहत्याग इतक्या भावपूर्ण भक्तिमय वातावरणात सादर केली गेली.आणि नाट्यरसिक पूर्ण स्वामीमय होऊन जातात.

दिग्दर्शक सुबोध सुर्जीकर यांचा उत्तम संवाद, प्रभावी दिग्दर्शन, नेत्रदीप प्रकाश योजना, श्रवणीय गाणी , लयबद्ध नृत्य, आणि ६० सहकलाकार सह श्री स्वामी समर्थांच्या भूमिकेत सिनेनट अशोक कुलकर्णी यांचा अभिनय हे जिवंत स्वामी दर्शन होते.

अशोक कुलकर्णी हे हुबेहूब स्वामी स्वरूपात जेव्हा अवतरतात तेव्हा खरोखर डोळ्यांचे पारणे फिटते. जस जसे नाट्य पुढे सरकते प्रेक्षकांचा स्वामी सहवास इतका वाढत जातो की, अनेक दृश्यात बघता बघता त्यांचे अश्रू कधी ओघळू लागतात त्याची जाणीव ही होत नाही.

अंतिम प्रवेशात देहत्याग नंतर संपूर्ण नाट्यगृह शोकाकुल होणे हीच या नाट्याची ताकद आहे.मुंबईत पुन्हा पुन्हा या नाट्यचे प्रयोग व्हावेत व स्वामी भक्तांनी स्वामी दर्शन घ्यावे अशी ही कलाकृती असल्याची भावना यावेळी उपस्थित स्वामी भक्तांनी केली.

**मध्य रेल्वे**

**ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती, पुनर्प्रायकरण, पुनर्स्थापित, तपासणे आणि पुरवठा**

वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (ट्रॅक्शन रोलिंग स्टॉक्स), इलेक्ट्रिक लोको शेड, कल्याण : ४२१ ३०१ हे भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खालील कामे/ सेवांसाठी www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे खुली ई-निविदा मागवित आहेत. कामाचे नाव : ईएलएस/केव्हायएन येथे संमत अम्ब्रेला कामा अंतर्गत डब्ल्यूएपी – ७ लोकोमोटिव्ह करीता ७७७५ केव्हीए ट्रान्सफॉर्मर, टाईप एलओटी ७७७५ ची दुरुस्ती, पुनर्प्रयकरण, पुनर्स्थापन, तपासणी आणि पुरवठा, परी. २ नं. निविदा क्र. ईएलएसकेव्हायएनडब्ल्यूकेएस-२४-३८-टीएफपी-यूएमबी कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,०२,७६,११३.५० (जीएसटी सह) इरठे/ बोली सुरक्षा: रु. २,०१,४००/- निविदा अर्जाचे शुल्क: नाही. पूर्तता कालावधी: २४ महिने. पूर्तता कालावधी: २४ महिने. उपरोक्त निविदेचा निविदा समाप्ती दिनांक आणि वेळ: ०८.०२.२०२५ रोजी ११.०० वा. पर्यंत आहे आणि ०८.०२.२०२५ रोजी ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील आणि ६० दिवसांपर्यंत वैध असतील. २. निविदेचा पूर्ण तपशील www.ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि वरी. डीईई (टीआरएस) कार्यालय, कल्याण ह्यांच्या कार्यालयामध्ये देखील उपलब्ध असेल.

**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाऊनलोड करा** 703

**केनरा बैंक Canara Bank** भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
**सिंडिकेट Syndicate**

**स्ट्रेस्ड ॲसेटस मॅनेजमेंट ब्रांच : सर्कल ऑफिस बिल्डींग, ८ वा मजला, `बी` विंग, सी-१४, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉप्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१, महाराष्ट्र.**
**दूर क्र. (०२२) २६७२८७९८/ ८७७१/ ८७४४/ ८४८२ / ८७८९/ ८७९३; ई-मेल :- cb15550@canarabank.com**

**विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतूदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषत: कर्जदार (रां) आणि सह-कर्जदार (रां) देण्यात येत आहे की खाली वर्णन करण्यात आलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण ठेवण्यात / भारीत करण्यात आली होती ज्याचा प्रत्यक्ष ताबा कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी घेतला असून कॅनरा बँकेच्या स्ट्रेस्ड ॲसेटस मॅनेजमेंट ब्रांच ह्यांच्या नेतृत्वाखालील समूहाला (कॅनरा बँक, बँक ऑफ महाराष्ट्र आणि साउथ इंडियन बँक) ह्यांना सदनिका क्र. ७०१, ७ वा मजला, ए विंग, मीनाक्षी अपार्टमेंट, गोकुळधाम कृष्णा वाटिका मार्ग, जन. ए. के. वैद्य मार्ग समोर, हाऊस क्र. २, १ (पी), गाव दिंडोशी, तालुका बोरीवली, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३ येथे वसलेल्या मे. एलिगंट फोर्ज अँड इक्विपमेंट प्रा. लि. ह्यांच्याकडून ३१.१२.२०२४ अनुसार रु. १३६.१०/- कोटी (रुपये एकशे छत्तीस कोटी आणि दहा लक्ष मात्र) अधिक ०१.०१.२०२५ पासूनचे व्याज आणि किंमतीच्या (वसुली दिनांकापर्यंत) वसुलीसाठी १२.०२.२०२५ रोजी "जे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे" आणि "जसे आहे तेथे आहे" तत्वावर करण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | मालमत्तेचे वर्णन | राखीव मूल्य (रु. मध्ये) | इसारा रक्कम ठेव (रु. मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | गट क्र. १२४, गाव कळमखंड, ता. वाडा, आरएमडी क्विकफॉर्म कं जवळ, किणीपाडा वाडा – मनोर रोड, जिल्हा पालघर ४२१ ३०३ येथे वसलेली औद्योगिक जमीन आणि कारखान्याची इमारत. मोजमाप : १७८८० चौ. मी. मे. एलिगंट क्रियेशंस प्रा. लि. ह्यांच्या मालकीचे (प्रत्यक्ष ताबा) | ५,६०,००,०००.०० | ५६,००,०००.०० |
| २. | गट क्र. ४२, गाव कंचड, ता. वाडा, बिल एनर्जी सिस्टिम्स लि. जवळ, ऑफ वाडा – मनोर रोड, गोरखे फाटा, जिल्हा पालघर ४२१३०३ येथे वसलेली औद्योगिक जमीन आणि कारखान्याची इमारत. मोजमाप : १०१९० चौ. मी. मे. एलिगंट क्रियेशंस प्रा. लि. ह्यांच्या मालकीचे आणि त्यावरील संयंत्रे आणि यंत्र सामग्री (प्रत्यक्ष ताबा) | १२,८७,००,०००.०० | १,२८,७०,०००.०० |
| ३. | गट क्र. ४७४/१, ४७४/२, ४७४/३, ४७४/५ आणि ४७४/४७५/२/१, गाव बिलोशी, ता. वाडा, ब्ल्यू स्टार लि. जवळ, कुडूस लि., ऑफ वाडा मनोर रोड, गोरखे फाटा, जिल्हा पालघर ४२१३०३ येथे वसलेली येथे वसलेली औद्योगिक जमीन आणि कारखान्याची इमारत. मोजमाप : ४५६६० चौ. मी. मे. एलिगंट फोर्ज अँड इक्विपमेंट प्रा. लि. ह्यांच्या मालकीचे आणि त्यावरील संयंत्रे आणि यंत्र सामग्री (प्रत्यक्ष ताबा) | १,१७,४३,००,०००.०० | ११,७४,३०,०००.०० |

इसारा रक्कम ठेव ११.०२.२०२५ रोजी सायं ५.०० वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी जमा करण्यात यावे.

प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीसह मालमत्तांच्या पाहणीचा दिनांक १०.०२.२०२५ (स. १०.०० वा ते दु. ०२.०० वा. दरम्यान) आहे.

कोणीही व्यक्ती जो यशस्वी बोलीदार आणेल तो मालमत्तेच्या विक्री मुल्याच्या १% किंवा दायित्व कराराच्या किमान रु. १०,०००/- पासून कमाल रु. ३,००,०००/- (जीएसटीसह) जे कमी असेल त्यासाठी पात्र असतील.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया कॅनरा बँकेच्या (www.canarabank.com) संकेतस्थळावर देण्यात आलेल्या "ई-ऑक्शन" लिंकचा कृपया संदर्भ घ्यावा किंवा श्री. मनोज कुमार गुप्ता, प्राधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक स्ट्रेस्ड ॲसेट मनेजमेंट ब्रांच, मुंबई (दूरध्वनी: ०२२२६७२८७७१ मोबा. क्र. ९८२८२३४३४४) किंवा श्री. प्रणय सोमकुवर, अधिकारी (मोबा क्र: ८३७८९७५७२२) ई-मेल आयडी: cb15550@canarabank.com वर कामकाजाच्या कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये किंवा सेवा पुरवठादार मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि. संपर्क क्र. ८२९१२२०२२० (हेल्प डेस्क) ई-मेल : support.ebkray@psballiance.com संकेतस्थळ: https://ebkray.in/) येथे संपर्क करावा.

**दिनांक: १८.०१.२०२५** **सही/- प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण: मुंबई** **कॅनरा बँक, एसएएम ब्रांच**

**इंडियन बैंक Indian Bank**
**इलाहाबाद ALLAHABAD**

**जुहू विले पार्ले शाखा, गझल व्हिला, ए २ मॉडेल टाऊन सीएचएस लि., गुलमोहर रोड, जेव्हीपीडी, मुंबई – ४०००४९ ई-मेल: jvp.j628@indianbank.co.in**
**संदर्भ: बीआर/सरफेसी/२०२४-२५/००३** **दिनांक: ३१.१२.२०२४**

**मागणी सूचना**

**सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत** सूचना

प्रती
श्रीमती अमृता ब्रजेश उपाध्याय (अर्जदार), सदनिका क्र. ३०४, फेज २, विंग एच इमारत क्र. २, रिलायबल गार्डन, गाव: जूचंद्र पालघर – ४०१२०८.
श्री. ब्रजेश कुमार उपाध्याय (सह-अर्जदार), सदनिका क्र. ३०४, फेज २, विंग एच इमारत क्र. २, रिलायबल गार्डन, गाव: जूचंद्र पालघर – ४०१२०८.
महोदय/ महोदया,
विषय: इंडियन बँक जुहू विले पार्ले शाखेमधील तुमचे गृह कर्ज खाते – ५०४३१४८३६३२.

तुमच्यापैकी पहिली व्यक्ती श्रीमती अमृता ब्रिजेश उपाध्याय ह्या अर्जदार आहेत. तुमच्यापैकी २ रा हा ब्रिजेश कुमार उपाध्याय हे सह-अर्जदार आणि गहाणदार आहेत. तुमच्यापैकी दोघेही गहाणदार असून तुमच्याकडून कर्ज खात्यांसाठी त्यांच्या मालमत्ता हमी म्हणून दिली आहे.

तुमच्यापैकी पहिल्या आणि दुसऱ्या व्यक्तीच्या विनंतीवरून, बँकिंग व्यवसायात, खालील सुविधा मंजूर केल्या गेल्या आणि तुमच्यापैकी पहिल्याने त्यांचा लाभ घेतला.

| अनु. क्र. | सुविधेचा प्रकार / खाते | मर्याद आणि व्याजाचा दर (रु.) | ३१.१२.२०२४ अनुसार थकबाकी | आकारलेले व्याज परंतु डेबिट न केलेले | आकारलेले दंड @२ व्याज (इंटरेस्ट) परंतु डेबिट न केलेले | ३१.१२.२०२४ अनुसार एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गृह कर्ज क्र. ५०४३१४८३६३२ | रु. १८,५०,०००/- ८.३०% (संमतीच्या वेळी) ८.९५% (सध्याचा) | रु. १७,८८,५३१/- | रु. ६७,९७५/- | रु. ९०/- | रु. १८,५६,५९६/- |
| | एकूण | रु. १८,५०,०००/- | रु. १७,८८,५३१/- | रु. ६७,९७५/- | रु. ९०/- | रु. १८,५६,५९६/- |

तुमच्या पैकी १ ले आणि तुम्ही २ रे ह्यांनी नमूद सुविधेसाठी खालील कागदपत्रे केली आहेत :

| सुविधेचा प्रकार | कागदपत्रांचे स्वरूप |
|---|---|
| गृह कर्ज | ए. संमती पत्र दिनांकित ०८.०२.१८ स्वीकृती |
| | बी. डीपीएन दिनांकित २३.०२.२०१८ |
| | सी. कर्जदार-गहाणदाराद्वारे शपथपत्र दिनांकित ०६.०२.२०१८ मध्ये जाहीर प्रकटन |
| | डी. जोडपत्र -७ बँकेच्या नावे कर्जदाराद्वारे करण्यात आलेले शीर्षक करार दिनांकित २३.०२.२०१८ गहाण म्हणून ठेवण्यात आल्याचे पत्र आणि रिसायटल एडीव्ही ८५ |
| | ई. डेब्ट वजा हमी दिनांकित ०६.०२.२०२४ ची स्वीकृती |

वरील कर्जाच्या परतफेडीसाठी तुमच्यापैकी क्र. २ ने खाली नमूद करण्यात आल्यानुसार मालमत्ता (मत्तांचे) गहाण/ तारण-गहाण ठेवून नमूद कर्ज सुरक्षित केले आहे.

व्याजासह रक्कम भरण्याची वारंवार विनंती केल्यानंतरही, तुम्ही सर्वजण व व्यक्तिशः उत्तरदायी असूनही, परतफेड करण्यात अयशस्वी ठरलात आणि थकबाकी केली. कर्ज खात्याचे वर्गीकरण २९.१२.२०२४ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मालमत्ता वर्गीकरणाशी संबंधित सूचना/मार्गदर्शक तत्त्वांनुसार गैर कार्यरत मालमत्ता (एनपीए) म्हणून केले आहे.

तुमच्या कडून ३१.१२.२०२४ अनुसार रु. १८,५६,५९६/- (रुपये अठरा लक्ष छपन्न हजार पाचशे शहाणव मात्र) आणि नमूद रकमेवर संमत व्याजाने भरणा होई पर्यंतच्या व्याजाच्या दराने ३१.१२.२०२४ पासूनचे व्याज.

सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत "कर्जदार" म्हणजे कोणतीही व्यक्ती जिच्यासाठी बँकेने आर्थिक सहाय्य मंजूर केले आहे किंवा जिच्याकडून कोणत्याही प्रकारची हमी देण्यात आली आहे किंवा बँकेने दिलेल्या आर्थिक सहाय्याच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही गहाण / चार्ज तयार केली आहे.

म्हणून, तुम्हा सर्वांना आणि प्रत्येकाला कळविण्यात येते की दिनांक २१.१२.२०२४ पर्यंतची रक्कम म्हणजेच - रुपये १८,५६,५९६/- (रुपये अठरा लक्ष छपन्न हजार पाचशे शहाणव मात्र) व्याजासह, आजपासून देय तारखेपर्यंतच्या 60 दिवसांच्या आत भरण्याचे आदेश दिले जात आहेत. अन्यथा, अधिनियमाच्या कलम १३ (२) अंतर्गत नोटिशीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत बँक आपल्या सुरक्षा व्याज अंमलबजावणीचे हक्क बजावेल, याची नोंद घ्यावी.

जर तुम्ही नोटिशीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुमची संपूर्ण देणी भरली नाहीत, तर बँक अधिनियमाच्या कलम १३ (४) अंतर्गत अनुसूचित सुरक्षित मालमत्तांविरुद्ध आपले अंमलबजावणी हक्क वापरण्यात येतील.

सदर सूचना दिनांकापासून ६० दिवस उलटल्यानंतर आणि तुम्ही मागणी पूर्ण करण्यात अपयशी ठरलात, तर बँक अधिनियमाच्या अंतर्गत हक्क बजावण्यासाठी मालमत्तेवर ताबा घेण्यासाठी आवश्यक पावले उचलेल.

अधिनियमाच्या कलम १३ (१३) च्या तरतुदीनुसार, सुरक्षित मालमत्तेचे (खाली यादीत दिलेले) कोणतेही हस्तांतरण (विक्री, भाडेपट्टी किंवा अन्य मार्गाने) बँकेच्या लेखी परवानगीशिवाय या नोटिशीच्या तारखेपासून केल्या जाऊ नये.

ही नोटिस बँकेला उपलब्ध असलेल्या इतर उपायांची कोणतीही हानी न करता तुम्हाला संबोधित केली गेली आहे.

ही नोटिश जारी केली जात आहे, याची नोंद घ्या, बँकेच्या हक्कांसाठी डीआरटी/ डीआरटी आरओ/डी आरएटी/ कोर्टासमोर कार्यवाही सुरू करण्याच्या आणि आदेश/डिक्रीच्या अंमलबजावणीसाठी बँकच्या हक्काला बाधा येणार नाही.

तसेच, प्रलंबित बिले, बँक गॅरंटी व पत्राद्वारे तुमच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही इतर आकस्मिक जबाबदाऱ्या बँक वसूल करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहेत.

"आम्ही तुमचे लक्ष सरफेसी कायद्याच्या कलम १३ (८) च्या तरतुदींकडे आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांकडे वेधतो, जे सुरक्षा हक्कांवर तुमचे अधिकार सूचित करतात."

सदर नोटिश जारी करण्यासाठी आणि वरील कलम १३ अंतर्गत शक्ती बजावण्यासाठी स्वाक्षरी केलेला अधिकारी बँकेचा अधिकृत अधिकारी आहे.

**अनुसूची:**


सुरक्षित मालमत्तांमध्ये सुरक्षा हक्क तयार केलेल्या मालमत्तेची विशिष्ट माहिती खालीलप्रमाणे आहे:

**गहाण मालमत्ता:** निवासी सदनिका क्र. ३०४, ३ रा मजला, फेज क्र. २, इमारत क्र. २ विंग एच रिलायबल गार्डन, गाव ज्यूचंद्र, नायगाव पूर्व, जिल्हा पालघर ४०२२०८ चा सर्व खंड आणि भूखंड.

नोंदणीकरण जिल्हा, उप जिल्हा पालघर – पिन ४०१२०८ मधील गाव ज्युचंद्र तालुका वसई येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ३७१ हिस्सा क्र. १.३ वर बांधण्यात आलेल्या "रिलायबल गार्डन एच आय जे के एल एम सीएचएस लि." म्हणून ज्ञात असलेल्या सोसायटीमध्ये साधारणपणे ३३.४६ चौ. मी. असलेले मोजमाप.

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक / अधिकृत अधिकारी**
**इंडियन बँक करीता**

हे जग म्हणजे झोपलेल्या लोकांची गर्दी आहे आणि झोपलेले लोक जागा झालेल्या माणसाला कधीही सहन करत नाहीत.



- महात्मा ज्योतिबा फुले

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, २० जानेवारी २०२५

# वाहतूक व्यवस्था सर्वव्यापी असावी !

राज्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही सक्षम नसेल तर वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब. देशातील लहान आणि मोठ्या अशा दोन्ही प्रकारच्या शहरांचा झपाट्याने विकास होत आहे. कार, दुचाकी वाहनांची संख्या कमालीची वाढली आहे. लांब अंतरावरून कामाच्या ठिकाणी जायचे तर नागरिकांना आपले स्वतःचे वाहन असण्याची गरज भासते आहे. याचे कारण म्हणजे सार्वजनिक परिवहन व्यवस्था म्हणजे बसेसचा काहीही उपयोग नसतो. एकतर त्यांची संख्या अपुरी असते आणि वेळेवर त्या मिळत नाहीत. त्यामुळे बसवर अवलंबून राहणे शक्य नसते. रिक्षा, टॅक्सी भाडे देणे परवडत नाही. अशावेळी स्वतःचे वाहन घेणे हाच एक पर्याय आपल्याजवळ उरतो आणि तेच केले जाते. पण यामुळे वाहतुकीच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. रस्ते अरुंद आणि व्यवस्थित नाहीत, एकाच रस्त्यावरून सर्वच प्रकारची म्हणजे लहान-मोठी वाहने धावत असतात. बस, ट्रकपासून बैलगाड्या, हातगाड्यांपर्यंत सगळी वाहने एकाच अरुंद रस्त्यावरून जात असतात. त्यामुळे आपल्या देशातील वाहतूक अतिशय धोकादायक बनली आहे. पण या समस्येकडे इतर समस्यांकडे केले जाते तसेच दुर्लक्ष केले जात आहे. अपघातांचे प्रमाण वाढत आहे. नागरिकांना अनेक प्रकारच्या गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे. पण प्रशासनाला त्याची कोणतीही फिकीर नाही. एका अहवालानुसार, राज्यात ४४ पैकी ३० शहरात अजूनही सार्वजनिक वाहतूक सेवाच अस्तित्वात नाही. तर अन्य १४ शहरात असलेली ही सेवा रडतखडत चालली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत तब्बल २४ हजार बसेस अजूनही कमी पडत आहेत. एक लाख प्रवासी असतील तर ६० बसेस आवश्यक असतात असे सांगितले जाते. वास्तवात या बसेस २०च्या आसपास सध्या दिसत आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे उपलब्ध ८७०० बसपैकी किमान साडेतीन हजार बसेस यांचे आयुर्मान संपलेले आहे. तरीही त्या रस्त्यावर धावत असून त्यामुळे लोकांच्या जीवाशी हा एक प्रकारे खेळ चालला आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. ठाणे पालिका कर्मचाऱ्यांचा पगार कसाबसा भागवताना वित्त विभागाला घाम फुटत आहे. त्यात परिवहन सेवेचा बोजा दर महिन्याला येत असल्यामुळे आर्थिक तरतूद करताना कसरत करावी लागत असल्याचे दिसते. हीच अवस्था नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेचीसुद्धा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सेवा देतानाच या सेवेचा विस्तारही ठाणे, मुंबई, कल्याण-डोंबिवली, बदलापूर, पनवेल, कर्जत, खोपोलीपर्यंत झाला. त्यामुळे या परिवहन सेवेची रोजची प्रवासी संख्या सुमारे पावणे तीन लाख एवढी झाली आहे. कल्याण-डोंबिवलीची परिवहन सेवा रडतखडत सुरू असून त्याला नवसंजीवनी देण्यासाठी शासनाच्या भरघोस निधीतून प्रयत्न नेहमी केला जातो. मात्र, प्रत्यक्षात आजच्या स्थितीला परिवहन सेवा असून नसल्यासारखी आहे. सध्या सेवेत काही नवीन बसेस आल्या असल्या तरी त्या अपुऱ्या पडतात. परिवहनच्या ताफ्यात ज्या बस आहेत. त्यातील अनेक नादुरुस्त असल्याने उर्वरित बसवर अवलंबून राहावे लागते. मात्र, देखभाल व दुरुस्ती अभावी या बसही रस्त्यात बंद पडतात. त्यामुळे, प्रवाशांची मोठी गैरसोय होते. परिवहन उपक्रमाला २५ वर्षे उलटूनही प्रवाशांना स्वस्तातली सार्वजनिक सेवा शोधावी लागते ही दुर्दैवी बाब. त्यातच शहरातील रिक्षांची संख्या दिवसागणिक वाढत असून वाहतूक कोंडी भीषण होत आहे. अंबरनाथ, बदलापूरवासी बस परिवहन सेवापासून वंचितच आहेत. उल्हासनगर महापालिका शहरात स्वतःची परिवहन सेवा असून ही सेवा काही प्रमाणात अंबरनाथ, बदलापूर पालिका हद्दीतही काही मोजक्याच मार्गांवर चालवण्यात येते. अंबरनाथ, बदलापूर शहरात परिवहन सेवेची नितांत गरज असून या दोन्ही शहरांत परिवहन सेवा सुरू करण्याची गेली अनेक वर्षे मागणी असतानाही ठोस हालचाली होत नाहीत. एकूणच शहरांमध्ये राहणे सुसह्य व्हावे यासाठी बहुतेक आशियाई देशांची सरकारे शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिकाधिक प्रबळ करण्याचा आणि विस्तारित करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार करणे म्हणजे रस्त्यावर केवळ बसेस, टॅक्सी किंवा ऑटोरिक्षांची संख्या वाढवणे नाही. हे एवढेच करणे पुरेसे असते तर भारतातील सगळी महानगरे जगातील अव्वल दर्जाची शहरे बनली असती. पण तशी ती नाहीत आणि वाहतुकीच्या समस्येच्या गत्रेत ती पूर्णपणे अडकली आहेत. म्हणूनच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही सर्वव्यापी आणि जलद असायला हवी. वाहतूक सुरळीत होण्यासाठी आवश्यक आहेत ते रस्ते. रस्ते ही कोणत्याही शहरातील मूलभूत सुविधा आहे. ज्या झपाट्याने शहरे आणि गावांचा विस्तार होत आहे, त्याप्रमाणात मूलभूत सुविधांचा विकास करण्यात आलेला नाही. नगरपालिका, महानगरपालिका यांना कमालीच्या मर्यादा आहेत. त्यांच्या उत्पन्नाची साधने अतिशय मर्यादित आहेत आणि त्यामुळे या सुविधा निर्माण करणे त्यांना अशक्य होत आहे. स्वाभाविकच नागरिकांना कमालीच्या गैरसोयी सोसाव्या लागतात. रस्ते हाही घटक त्यातलाच एक आहे. रस्त्यांचा विकास जेथे झाला आहे तेथेही तो व्यवस्थित अभ्यास करून केलेला नाही. त्यामुळे वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न कायम राहिला आहे. प्रत्येक बाबतीत राजकारणाचाच विचार करणाऱ्या आपल्या देशात मूलभूत सुविधा पुरवतानाही राजकारण केले जाते. परिणामी सर्वसामान्यांचे हाल नित्याचे झाले आहेत. रेल्वे आणि बसेसच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतुकीचे जाळे वाढवले तर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी संपण्याची शक्यता आहे. अन्यथा हा वाहतूक कोंडी व मनस्ताप हा खेळ अखंड सुरूच राहील. परिवहन उपक्रमाला २५ वर्षे उलटूनही प्रवाशांना स्वस्तातली सार्वजनिक सेवा शोधावी लागते ही दुर्दैवी बाब. त्यातच शहरातील रिक्षांची संख्या दिवसागणिक वाढत असून वाहतूक कोंडी भीषण होत आहे. वास्तविक स्थानकमधून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांसाठी स्टेशन परिसरातून थेट सेवा आल्याने अनेक प्रश्न सुटू शकतात. अंबरनाथ, बदलापूरवासी बस परिवहन सेवापासून वंचितच आहेत. उल्हासनगर महापालिका शहरात स्वतःची परिवहन सेवा असून ही सेवा काही प्रमाणात अंबरनाथ, बदलापूर पालिका हद्दीतही काही मोजक्याच मार्गांवर चालवण्यात येते. अंबरनाथ, बदलापूर शहरात परिवहन सेवेची नितांत गरज असून या दोन्ही शहरांत परिवहन सेवा सुरू करण्याची गेली अनेक वर्षे मागणी असतानाही ठोस हालचाली होत नाहीत. अंबरनाथ शहरात राज्यातील तिसऱ्या क्रमांकाची मोठे एमआयडीसी क्षेत्र आहे. शेकडो एकर पसरलेल्या आणि नव्याने होणाऱ्या पाले एमआयडीसीत जवळपास एक हजाराहून अधिक कंपन्या आहेत आणि त्या ठिकाणी एक लाखाहून अधिक कामगार नियमित प्रवास करतात. तसेच, अंबरनाथ तालुक्याच्या वेशीपर्यंत होणारे शहरीकरण आणि अंबरनाथ, बदलापूर शहरांचा विस्तार पाहता या ठिकाणी परिवहन सेवा सुरू करत रिक्षा चालकांकडून होणारी लूट थांबवण्याची गरज आहे. एकूणच शहरांमध्ये राहणे सुसह्य व्हावे यासाठी बहुतेक आशियाई देशांची सरकारे शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिकाधिक प्रबळ करण्याचा आणि विस्तारित करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार करणे म्हणजे रस्त्यावर केवळ बसेस, टॅक्सी किंवा ऑटोरिक्षांची संख्या वाढवणे नाही. हे एवढेच करणे पुरेसे असते तर भारतातील सगळी महानगरे जगातील अव्वल दर्जाची शहरे बनली असती. पण तशी ती नाहीत आणि वाहतुकीच्या समस्येच्या गत्रेत ती पूर्णपणे अडकली आहेत. म्हणूनच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही सर्वव्यापी आणि जलद असायला हवी.

# 'केईएम'ची शतकपूर्तीकडे वाटचाल



**महापालिकायन**

सुनील शिंदे
मोबाईल नंबर-९८२१९९६११७

**मुंबईचा** अभिमान वाढेल असा क्षण मुंबईकरांच्या वाट्याला आला आहे. मुंबई शहर हे जसे श्रीमंत सुखवस्तू घराण्यातील लोकांचे आहे तसेच ते गोरगरीब, कष्टकरी, श्रमिकांचेही आहे. या गोरगरीब ,कष्टकरी, श्रमिकांच्या आरोग्याची काळजी वाहणारे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परळ येथील 'सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रूग्णालय (केईएम हॉस्पिटल) उद्या मंगळवार पासून शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. याचा सार्थ अभिमान मुंबईकरांना आहेच पण देशातील सर्वच राज्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. कारण के ई एम हॉस्पिटल केवळ मुंबईकरांना च सेवा देत नाही तर देशातील कानाकोऱ्यातून रुग्ण उपचारासाठी येतात. ही देशभरातील रुग्ण मंडळी मुंबईत के ई एममध्ये का येतात तर तिथे निष्णात डॉक्टर आहेत. तेथील सर्व उपकरणे, यंत्रे , शस्त्रक्रिया केंद्रात असलेले सर्व साहित्य हे परदेशातून आयात केलेली आहेत. उपचार मोफत तर काही तपासण्या अगदी रुग्णांना परवडेल अशा दरात होतात. रुग्णालय परिसरात अनेक संस्था दररोज रुग्णांच्या नातेवाईकांना दुपार व रात्रीचे जेवण सेवा भाव म्हणून पुरवत असतात. सावली किंवा संत गाडगे महाराज यांच्या नावाने कार्यरत असलेली संस्था रुग्णांच्या नातेवाइकांना अगदी अल्प दरात राहण्याची व्यवस्था करतात. मुंबईत अनेक दानशूर संस्थाही आहेत. त्या अतिगंभीर आजारावर होणाऱ्या खर्चाचा भार उचलतात.रुग्णांना आर्थिक मदत करतात. अशा प्रकारे साऱ्या सोयी सुविधा मिळत असल्यामुळे मानसीक समाधान रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांना मिळते. त्यामुळे रुग्ण लवकर बरा होऊन मोठा श्वास घेऊन कृतज्ञतेची भावना व्यक्त करत आपल्या घरी परततो. अशा अनेक रुग्णांना पुन्हा ठणठणीत करून के ई एम रुग्णालयाने घरी पाठवले आहे. हा विश्वास असल्याने खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेले रुग्ण

अतिगंभीर झाल्यानंतर शेवटचा उपाय म्हणून त्यांचे नातेवाईक मग के ई एम रुग्णालयात रुग्णाला आणतात. डॉक्टर मंडळी शेवट पर्यंत त्यांना जीवदान देण्याचा प्रयत्न करतात. पण अनेकदा शेवटची घटका मोजत असलेला रुग्ण उपचाराला साथ देत नाही आणि शेवटी मग तो रुग्ण दगावतो. असेही प्रकार घडतात. के ई एम रुग्णालयात रुग्णाची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्यामुळे सर्वच उपचारासाठी वेळ लागतो. दाखल असलेल्या प्रत्येक रुग्णाची चौकशी ५-५ मिनिटानंतर करणे तिथल्या डॉक्टर व परिचारिकांना शक्य नसते. त्यातच मोठ्या राजकारणी, लोकप्रतिनिधी, ओळखीच्या लोकांनी पाठवलेल्या रुग्णांकडेही वैयक्तिक लक्ष देणे त्यांना शक्य होत नाही.अशा वेळी रुग्णांचे नातेवाईक खट्टू होतात. ते वरिष्ठांकडे तक्रार करतात. असे ही अनुभव येतात.अनेकदा रुग्णांनी वॉर्ड भरलेला असतो. खाट रिकामी नसते तरी नवीन दाखल होण्यासाठी आलेल्या रुग्णांना परत पाठवले जात नाही. खाली गादी अंथरूण त्या रुग्णावर उपचार केले जातात. ही वस्तुस्थिती आहे. यात कुठलीही अतिशयोक्ती नाही. हे आमचे अनुभवाचे बोल आहेत. केवळ के ई एम रुग्णालय शंभरी गाठतेय व त्या निमित्ताने समारंभ होत आहे म्हणून ही मखलाशी नाही हे कृपया लक्षात घ्यावे.

## के ई एम चा इतिहास

मुंबई शहरात ब्रिटिश राजवटीत अनेक इमारती उभ्या राहिल्या आहेत. मग ते भारताचे प्रवेश द्वार असेल, मुंबई विद्यापीठ, मुंबई महानगर पालिका मुख्यालय, मुंबई उच्च न्यायालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, मुख्य पोस्ट ऑफिस जनरल, शिवडी, वरळी, नायगाव दादर येथील बी डी डी चाळी, किल्ला कोर्ट, सरकारी जे जे रुग्णालय, कामा रुग्णालय, जी टी रुग्णालय, व मुंबई महानगर के ई एम रुग्णालयाचा समावेश आहे. अनेक इमारतींना.१५० पेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. अजूनही त्या ताठ मानेने उभ्या आहेत. १९०७ साली वैद्यकीय क्षेत्र तेव्हाच्या बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे सोपविण्यात आला होता. सेठ गोवर्धनदास सुंदरदास यांच्या कुटुंबियांच्या देणगीमुळे आणि सर फिरोजशहा मेहता, डॉ. जीवराज मेहता अशा अनेकांच्या पुढाकाराने सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि राजे एडवर्ड (सातवे) स्मारक रुग्णालयाची स्थापना झाली. सन १९२५ मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणासाठी सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाले. तदनंतर फेब्रुवारी १९२६ मध्ये राजे एडवर्ड (सातवे) स्मारक रुग्णालय १२५ रुग्णशय्यांनी सुरु झाले. तर २२ जानेवारी १९२६ रोजी रुग्णालयाचे उद्घाटन झाले. त्यावेळी रुग्णालय बांधण्यासाठी २५ लाख २७ हजार ६९९ रुपये तर वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारण्यासाठी १३ लाख ६४ हजार ५७४ रुपये इतका खर्च आला होता. त्याचा आरखडा हा जॉर्ज विटेट या ब्रिटीश वास्तुरचनाकाराने बनवला होता. परंतु पुष्कळशा गोष्टी भारतीय बनावटीच्या असाव्यात असा डॉ. रुस्तुम कूपर, डॉ. पटेल इत्यादींचा आग्रह होता आणि तशाच त्या बनविल्या गेल्या. डॉ. जीवराज मेहता ह्यांनी प्रथम 'अधिष्ठाता' हे पद भूषविले. त्यानंतर पुढे ते गुजरातचे मुख्यमंत्री बनले. फक्त १२५ रुग्णशय्येने सुरुवात झालेले रुग्णालय आता २२५० रुग्णशय्या असलेले रुग्णालय झाले आहे.सेठ गो. सु. वैद्यकीय महाविद्यालयात सुरुवातीला फक्त ४६ विद्यार्थी होते, त्यात सहा विद्यार्थीनी होत्या. केईएम रुग्णालय आणि सेठ गोसुवै महाविद्यालयात प्रशिक्षण घेऊन पारंगत झालेले असंख्य डॉक्टर्स जगाच्या वेगवेगळ्या कानाकोप-यात स्वतःचे रुग्णसेवेचे कौशल्य जगाला प्रदान करीत आहेत. आपापल्या क्षेत्रात प्रथितयश असलेल्या अनेक नामांकित डॉक्टरांमध्ये सेठ गोसुवै महाविद्यालयातील डॉक्टरांचा मोठा वाटा आहे.

## रुग्णालय विस्तारण्याची गरज

१०० व्या वर्षात पदार्पण करताना केईएम रुग्णालयाच्या जुन्या इमारती जर्जर झाल्या आहेत. त्यांना नवउभार देताना कर्मचारी, परिचारिकांसाठी, अनेक प्रयोगशाळांसाठी नवीन वास्तू उपलब्ध करण्याची गरज आहे त्यादृष्टीने शताब्दी इमारत, कर्मचारी भवन, परिचारिकांसाठी वसतिगृह तसेच वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी परीक्षागृह वर्गाची सोय असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे. पण इच्छापूर्ती च्या अभावी ते शक्य होत नसल्याचे दबक्या आवाजात सांगितले जात आहे. खरे तर के ई एम रुग्णालयाची सध्याची हेरिटेज इमारत तसेच १३ मजल्यांची इमारत, के ई एम समोरची सी व्हीं सी टी इमारत, टाटा रुग्णालयासमोरील इमारत, या सर्वच इमारती आता कमी पडू लागल्या आहेत त्यामुळे रुग्णालयाचा आकार विस्तारण्याची गरज निर्माण झाली आहे.डॉ संजय ओक हे रुग्णालयाचे अधिष्ठाता असताना त्यांनी रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचा आराखडा तयार केला आहे. तो सर्व राजकीय सत्ताधारी धुरिणांना दाखवला आहे. पण त्यांनी त्याबाबत पावले उचलल्याचे दिसत नाही. त्यांची इच्छाशक्ती दिसली नाही.त्यामुळे १६ वर्षे तो आराखडा अंमलबजावणीची प्रतीक्षा करीत आहे. या शताब्दी वर्षात त्यावर विचार होणे आवश्यक आहे. शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमांना १८ जानेवारी पासून सुरुवात झाली आहे. २२ जानेवारी पर्यंत हा कार्यक्रम के ई एम रुग्णालयाच्या आवारात सुरू आहे.कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी केईएम रुग्णालयतील कर्मचारी आणि डॉक्टरांच्या सुविधेसाठी एकूण २१ मजली इमारत बांधण्यात येणार आहे. त्यामध्ये १२० खोल्या कर्मचारी वर्गासाठी आणि ६३ खोल्या डॉक्टरांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अस्थिव्यंग उपचार विभागाच्या आवारातील जागेत ही इमारत उभारण्याचे नियोजित आहे. शतक महोत्सवी वर्षात नियोजित कार्यक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता झाला. यावेळी केईएम रुग्णालय कर्मचारी भवन या २१ मजली इमारतीचे भूमिपूजन देखील मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. तसेच आज अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या हस्ते नॉन अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसिज या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी सदिच्छादूत (बॅण्ड एम्बेसेडर) म्हणून कार्यरत असणार आहेत. नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटिस या आजारामध्ये फॅटी लिव्हरमुळे रूग्णाला सोरायसिस होऊ शकतो. आधुनिक जीवनशैलीमुळे तरूणाईत वाढणाऱ्या या आजारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पहिल्या बाह्य रूग्ण विभागाची सुरूवात केईएम रुग्णालयात करण्यात आली. नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटिस (नॅश - NASH) हा नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (NAFLD) चा एक प्रकार आहे. यकृताच्या या आजाराचे निदान करुन उपचार घेणे गरजेचे आहे. याकरिता सदर आजारांवरील उपचारासाठी केईएम रुग्णालयामध्ये स्वतंत्र ओपीडी स्थापन केली जाणार आहे. पण एव्हढ्यानेच भागणार नाही. केईएम रुग्णालयाच्या मागील बाजूस असलेल्या मोरच्युरी पासून आर एम ओ हॉस्पिटल पर्यंत ६० हजार चौरस फूट जागा आहे. तेथील हेरिटेज बांधकाम कायम ठेवून या जागेचा आणि आताच्या एफएसआयचा वापर करून तब्बल ४२ मजली रुग्णालय इमारत उभारणे व त्यामध्ये रुग्णांना चांगल्या वैद्यकीय सुविधा, उपचार, सर्व चाचण्या, शस्त्रक्रिया करणे आदी सर्वच बाबी शक्य आहेत. आता विखुरलेले ऑपरेशन थिएटर, लॅब, अशा प्रकारचे विभाग एकाच मजल्यावर आणता येतील त्यामुळे रुग्णांच्या नातेवाइकांना होत असलेला त्रास कमी होईल. अशी कल्पना आहे. त्याच बरोबर अगदी खूपच आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यास राज्याच्या कोणत्याही जिल्ह्यातील रुग्णाला हेलिकॉप्टर द्वारे मुंबईत तातडीने आणून केईएम रुग्णालयाच्या या ४२ मजली इमारतीवर हेलिपॅड उभारल्यास त्या ठिकाणी उतरवून त्या रुग्णावर तातडीने उपचार करून त्याचे प्राण वाचविणे शक्य होईल. विदेशात अनेक ठिकाणी रुग्णालयाच्या टेरेसवर हेलिपॅड उभारले जाते आणि तेथे हेलिकॉप्टर द्वारे रुग्णाला रुग्णालयात आणून उपचार दिले जातात. त्यामुळे मुंबईत सुद्धा अशा पद्धतीने वैद्यकीय उपचार तातडीने करून त्या रुग्णाचा जीव वाचविणे शक्य होईल. के ई एम शेजारी असलेली केंद्राची ई एस आय सी ची जागा जवळजवळ रिकामी पडली आहे. १०-१५ रुग्ण तिथे असतात. तिथे मेडिकल कॉलेज उभारता येवू शकते. के ई एम समोर हाफकिन ची २२ एकरची जागा आहे. तिथे आता कामकाज होत नाही. ती जागा मिळाल्यास तिथे वैद्यकीय विद्यापीठ बांधण्याची योजना आहे. रुग्णालयामागे असलेल्या परिचारिका.निवासस्थानाची २५ मजले बांधायचे आहेत पण आताशी ४ मजले बांधून पूर्ण झाले आहे. वडाळा येथील ॲकवॉर्थ रुग्णालय येथे १६ मजली हॉस्टेल इमारत उभारली आहे. त्याला ३-४ महिने झाले आहे पण त्याला अद्याप ओसी मिळालेली नाही.तिथे १४०० विद्यार्थ्यांची निवासाची सोय होऊ शकते. भक्ती पार्क येथे साडेतीन एकर जागा kem प्लॅन २ साठी हवी आहे. के ई एम विस्तार करण्यासाठी या आवश्यक बाबी आवश्यक आहे. रुग्णालयाच्या या शताब्दी वर्षात या बाबींची पूर्तता होईल अशी अपेक्षा राज्य सरकार व मुंबई महानगरपालिका प्रशासन यांच्याकडून केली तर तो वावगी ठरणार नाही.

●

# पत्र मानस

## अतिक्रमणांवर कारवाई अशक्य!

कुठलीही निवडणूक आली की शहरात बेकायदा कामना ऊत येतो. महापालिका अधिकारी, पोलीस यंत्रणा हे सगळेच निवडणुकीच्या कामात गुंतलेले असतात. शिवाय अतिक्रमण हे काय एका दिवसात होत नाही.अतिक्रमण करणाऱ्याच्या डोक्यावरती सुद्धा कुणाचा तरी वरदहस्त असतो. त्याशिवाय मोठया प्रमाणात अतिक्रमण होऊ शकत नाही. चिरीमिरी घेऊन आपल्याच नोकरीशी गद्दारी करणारे महापालिकेत कमी नाहीत.मुबंई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी तातडीने अतिक्रमण केलेल्या बांधकामावर हातोडा घाला ते पाडा हे काम वेगाने करा असा स्पष्ट निर्देश देऊन सुद्धा गेल्या आठ दिवसापासून अतिक्रमण कारवाईला सुरुवात झाली नाही. अंमलबजावणीसाठी चाल ढकल केली जात आहे. यावरून स्पष्ट होते की अतिक्रमण करण्यासाठी किती लोकांचे हात बरबटले गेले असणार.नाहीतर अतिक्रमण कारवाईला वेग नक्कीच आला असता. या ठिकाणी गो. रा खैरनार असते तर आदेश मिळताच अतिक्रमण हटवले गेले असते. अश्विनी भिडे यांना गो. रा. खैरनार व्हावे लागेल. नाहीतर पालिका कर्मचारी तुम्हाला जुमानणार नाहीत.

**-श्री दत्ता श्रावण खंदारे धारावी**

## भारत जोडो यात्रेतील सहभाग तपासा

राज्यातील विधीमंडळ अधिवेशनात भारत जोडो यात्रेतील सहभागी संघटना बाबतीत नव्याने पण तितकेच गंभीर आरोप करण्यात आले आहे. काँग्रेस सर्वेसर्वा खा.राहुल गांधीनी भारत जोडो यात्रा आणि त्यानंतर भारत न्याय यात्रा असे अभियान राबवले आहे. त्यांच्या 'जोडो' या शब्दाला काहींनी नाराजी व्यक्त केली कारण भारतहा कुठेही विभक्त म्हणजे तुटला नाही तर 'जोडो' शब्दाची आवश्यकता का असावी. खा. राहुल गांधीनी दक्षिणेकडून उत्तरेकडे आणि नंतर पूर्व कडून पश्चिमेस असा प्रवास केला. भारत जोडो यात्रा पायी तर भारत न्याय यात्रा ही बसने पूर्ण केली आहे. जवळपास बारा ते चौदा राज्यातील प्रवासात जवळपास शंभरहून अधिक संघटनानी सहभाग घेतला होता. दुर्दैवाने त्यापैकी जवळपास चाळीस संघटना ह्या नक्षलवादी संघटनेच्या संपर्कातील असल्याचा मुख्यमंत्री यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री यांचे म्हणणे हे पोलिसांनी म्हणजेच गृह खात्याने घोषित केलेला नक्षली संबंधित संघटना आहेत. भारत जोडो यात्रेमुळे खा.राहुल गांधींची प्रतिमा सुधारली होती आणि लौकिकही त्यांचा वाढला होता पण आता संपूर्ण अभियानाचाच संबंध अर्बन नक्षलवादाशी जोडला जात असल्यामुळे भारत जोडो यात्रेतील त्यासर्व सहभागी संघटनेचा तपास होणे आता काळाची गरज आहे,असे वाटते.

**- श्री संजय गंगाराम साळगांवकर ,मुंबई**

## संसदेची उत्पादकता का कमी होत आहे?

१८ व्या लोकसभेच्या पहिले हिवाळी अधिवेशन अचानक संपले. २५ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या अधिवेशनात २० बैठका झाल्या. लोकसभा व राज्यसभेचे एकूण १०५ तास काम झाले. लोकसभेची उत्पादकता ५७.८७ टक्के, तर राज्यसभेची उत्पादकता ४१ टक्के नोंदली गेली. संसदेत चार विधेयक मांडण्यात आली. मात्र, एकही विधेयक मंजूर झाले नाही.संसदेच्या अधिवेशनात जनतेच्या आणि देशाच्या दृष्टीने महत्वाच्या मुद्यांवर चर्चा व्हावी,जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळावा,ही अपेक्षा असते.संसदेचे हिवाळी अधिवेशन चर्चेपेक्षा अंदोलने, गदारोळाने गाजले. राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आपल्या पक्षासाठी नसून जनतेच्या काम केले पाहिजे. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी संसदेच्या कामकाजाचे प्रमाण १०० टक्क्यांच्या वर नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे व संसदेत शिस्त पाळली पाहिजे.संसदेची प्रतिष्ठा व शिष्टाचार राखणे ही सर्व सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे. अधिवेशनात काम किती व खर्च किती होतो याचा विचार करावा. जनतेच्या विश्वासाची आणि अपेक्षांची खिल्ली उडवू नका.

**-विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## माता न तू वैरिणी !

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. या दोन अक्षरांपासून 'आई' हा शब्द बनतो. ईश्वराच्या आधीही कोणाचा मान असेल तर तो 'आई'चा आहे. आपल्या अपत्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या, प्रसंगी प्राणाची बाजी लावणाऱ्या, सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या अनेक मातांच्या कथा आपण ऐकल्या आहेत आणि वाचल्या आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात आपल्या आईचे अनन्यसाधारण महत्व आहे; मात्र 'आई' सारख्या पवित्र शब्दाला काळिमा फासणाऱ्या घटना तामिळनाडू आणि मुंबई शहरात घडल्या. पोटच्या अल्पवयीन मुलीचे अश्लील व्हिडीओज बनवून ते इंटरनेटवर टाकून मुलीला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याप्रकरणी तामिळनाडू पोलिसांनी एका दाम्पत्याला अटक केली. मुलीच्या नकळत हे दाम्पत्य मुलीचे अश्लील व्हिडीओ बनवत होते. अशा अनेक अश्लील व्हिडीओ क्लिप्स या पालकांच्या मोबाईलमध्ये पोलिसांना सापडल्या आहेत. या नराधम आई वडिलांना पोक्सो कायद्याच्या अंतर्गत अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे. अशाच प्रकारच्या एका घटनेतील आरोपी आईला न्यायालयाने नुकतीच नऊ वर्षांची शिक्षा सुनावल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या आईनेसुद्धा आपल्या अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले होते आणि त्यातून मिळणाऱ्या पैशातून ती स्वतःचा चरितार्थ चालवत होती. मातृत्वाच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटना समाजात नैतिक मूल्यांचा किती मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे हे दर्शवत आहेत.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई**

■

## रत्नागिरीतील क्रांतिनगरमधील युवकांचा मनसेत पक्षप्रवेश

**रत्नागिरी:** मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या तेजस्वी विचारांनी प्रेरित होऊन आणि सन्माननिय नेते , मनविसे अध्यक्ष अमित ठाकरेंच्या नेतृत्वाने प्रभावित होवून आज रत्नागिरीतील क्रांतीनगर मधून अनेक युवकांनी आज मनसेच्या रत्नगड या रत्नागिरी तालुका संपर्क कार्यालयात मनविसेत पक्ष प्रवेश केला. या पक्षप्रवेश प्रसंगी मनसे तालुका अध्यक्ष रुपेश जाधव, मनविसे दक्षिण रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष गुरुप्रसाद चव्हाण, तालुका सचिव अभिलाष पिलणकर, मनविसे शहर अध्यक्ष श्री तेजस साळवी, माजी शहर अध्यक्ष श्री राज परमार , विभाग अध्यक्ष सोम पिलणकर आदी मनसे पदाधिकारी उपस्थित होते.



### म ह त्त्वा चे



## केंद्राकडूनच अनुदान आले नाही

**नाशिक :** शेतकऱ्यांना अनेक योजनांचे अनुदान अद्यापपर्यंत मिळालेले नाही. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. सरकारकडून अनुदान कधी मिळणार? याची वाट शेतकरी पाहत आहेत. यावर राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रतिक्रिया दिली. केंद्र सरकारकडून अनुदान न आल्याने शेतकऱ्यांना देऊ शकलो नाही, अशी खदखद कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केली. अजित पवारांनी काही तरतूद केली, तर पुढील आठवड्यात अनुदान दिले जाईल, असेही ते म्हणाले. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे नाशिक दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केले. शेतकऱ्यांसाठी अजित पोर्टल सुरू करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या नाराजीवरही आपले मत मांडले. केंद्र सरकारच्या अनेक योजनांचे अनुदान आहेत, पण ते मिळत नाही. केंद्राकडून अनुदान न आल्याने शेतकऱ्यांना देऊ शकलो नाही. अजितदादांनी काही तरतूद केली, तर पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना देणार आहे. पर्वा अजित पवार यांच्यासोबत बैठक असणार आहे, असे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले.

## आसाममध्ये राहुल गांधींविरोधात FIR

**नवी दिल्ली:** राहुल गांधींच्या नुकत्याच केलेल्या वक्तव्याबाबत आसाममधील गुवाहाटी येथील पान बाजार पोलिस ठाण्यात शनिवारी एफआयआर दाखल करण्यात आला. राहुल यांनी भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणणारी विधाने केल्याचा एफआयआरमध्ये आरोप आहे. BNS च्या कलम 152 अंतर्गत, ते अजामीनपात्र गुन्ह्याच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. तक्रारदार मोनजीत चेतिया यांनी आरोप केला आहे की, राहुल गांधींच्या वक्तव्याने स्वीकारार्ह भाषणाची मर्यादा ओलांडली आहे. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. गुवाहाटी उच्च न्यायालयाचे वकील चेतिया यांनी तक्रारीत लिहिले आहे की, सध्या विरोधी पक्षनेतेपद भूषविणाऱ्या एका व्यक्तीने सार्वजनिक व्यासपीठावरून दिलेले वक्तव्य ही सामान्य राजकीय टिप्पणी नाही. खरे तर, 15 जानेवारी रोजी काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयाच्या उद्घाटनावेळी राहुल म्हणाले होते की, भाजप आणि आरएसएसने प्रत्येक संस्था काबीज केली आहे. आता आम्ही भाजप-आरएसएस आणि भारतीय राज्याशी लढत आहोत. राहुल यांच्या या वक्तव्यामुळे हिंदू सेनेने दिल्ली पोलीस आयुक्तांकडे तक्रारही केली होती, ज्यामध्ये राहुल यांच्या देशविरोधी वक्तव्याबद्दल कारवाई करण्यात यावी, असे लिहिले होते. मनोज चेतिया यांनी एफआयआरमध्ये दावा केला आहे की, राहुल गांधींची ही टिप्पणी निवडणुकीत वारंवार झालेल्या पराभवाच्या निराशेने प्रेरित आहे. चेतिया म्हणाले- विरोधी पक्षनेते म्हणून, लोकशाही संस्थांवर जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी राहुल गांधींवर आहे, परंतु त्याऐवजी त्यांनी आपल्या व्यासपीठाचा फायदा घेऊन खोटे बोलणे आणि बंडखोरी करणे पसंत केले, ज्यामुळे भारताची एकता आणि सार्वभौमत्व धोक्यात आले.

# ठाण्यातले चोर आम्ही मुंबईत पकडू, दोन सामने गमावले तरी तिसरी मॅच ठाण्यात जिंकू!

## राऊतांची ठाण्यात फटकेबाजी

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाकरे सेनेचे नेते संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नाव न घेत जोरदार हल्लाबोल केला आहे. ठाणे येथील दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या शक्तीस्थळ मैदानात हिंदूहृदयसम्राट चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत संजय राऊत उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी शिंदे गटावर निशाणा साधला आहे.



संजय राऊत म्हणाले, समुद्रात बुडणाऱ्या त्या बोटीमधील 35 जणांचे प्राण आसिफ यांनी वाचवले, दुसरीकडे दुसऱ्या चोराला पकडणारा चेतन चौधरी आमचा शाखा प्रमुख आहे. सैफ आली खान यांच्या घरी चोरी करणारा चोर देखील ठाण्यात पकडला. ठण्यातले चोर आम्ही मुंबईत पकडू. आता पुढील मॅच ठाण्यात जिंकायची आहे. भलेही आम्ही दोन सामने गमावले असले तरी तिसरी मॅच महापालिकेची आम्हीच जिंकणार, असे संजय राऊत म्हणाले आहेत.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता दिसत आहे. त्यानुसार सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. शिर्डी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे अधिवेशन पार पडले. यावेळी देखील अजित पवारांनी कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत.

तसेच नांदेड येथे देखील भाजप नेते व खासदार अशोक चव्हाण यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी अशोक चव्हाण यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचे संकेत दिले आहेत. कार्यकर्त्यांची इच्छा असेल तर स्वबळावर लढू, असे त्यांनी म्हंटले आहे. तसेच नांदेड शहरात तसेच जिल्ह्यात भाजपची ताकद मोठी आहे त्यामुळे इथली जागा भाजपलाच मिळावी असा आमचा आग्रह असणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

# धनंजय मुंडेंच्या लाभार्थी टोळ्या संपल्या पाहिजेत

## आक्रोश मोर्चात जरांगेंचा थेट हल्लाबोल



प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज शहरात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर थेट हल्लाबोल केला. धनंजय मुंडे यांच्या लाभार्थी टोळ्या संपत नाही तोपर्यंत मोर्चे काढले जातील असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. आरोपींना फरार होण्यासाठी मदत करणारे कोण आहेत, त्यांचा शोध घेऊन त्यांनाही आरोपी केले पाहिजे या मागणीसाठी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मराठवाड्यात हत्येच्या दोन घटना घडल्या आहेत. परभणी जिल्ह्यात संविधानाची विटंबना झाल्यानंतर निषेध मोर्चा निघाला होता. त्यानंतर पोलिसांनी परभणीत कोम्बिंग ऑपरेशन केले. यात कायद्याचा विद्यार्थी सोमनाथ सूर्यवंशीला पोलीसांनी पकडले. पोलीस कोठडीत सोमनाथचा मृत्यू झाला. सोमनाथचे कुटुंबिय देखील आक्रोश मोर्चात सहभागी झाले होते. दोन्ही कुटुंबातील कर्ते पुरुष गेले आहे. या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. सर्वपक्षीय नेते या मोर्चात सहभागी झाले.

यावेळी मनोज जरांगे यांनी बीडमधील दहशतीला धनंजय मुंडे जबाबदार असल्याचा आरोप केला. येत्या काळात अशी परिस्थिती परत कोणावर येऊ नये म्हणून धनंजय मुंडेंच्या टोळया संपवल्या पाहिजे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले. ते म्हणाले की, तो (धनंजय मुंडे) त्यांच्या लोकांना थांबवत नाही, याचा अर्थ त्यांची मुकसंमती त्यांच्या लोकांना आहे. तुम्हाला वाटत असेल की, आम्ही खुप ताकदवान आहोत, मात्र एकदा मराठा रस्त्यावर उतरला तर कोणीही उरणार नाही, असा इशाराही जरांगेंनी दिला.

वाल्मिक कराड याच्या सुटकेसाठी गेल्या काही दिवसांपासून मोर्चे आणि आंदोलन सुरु आहे. यावरुनही जरांगेंनी धनंजय मुंडेंवर निशाणा साधला. ते म्हणाले की, लाभार्थी टोळींनी आरोपींच्या बाजूने मोर्चे काढायला सुरुवात केली आहे. ही पद्धत त्यांनी सुरु केली आहे. आम्ही कधीही जातीयवादी बोललो नाही, मात्र या लाभार्थी टोळीवर बोलायचे नाही का? असा सवाल जरांगेंनी केला. कोणाचेही नाव न घेता जरांगे पाटील म्हणाले की, त्यांच्या जातीची त्यांच्या जिल्ह्यात पत होती, मात्र या टोळीच्या कारनाम्यामुळे आता त्यांनी ती पत गमावली आहे. धनंजय मुंडेंच्या टोळ्या संपवाव्या लागतील. असे मनोज जरांगे म्हणाले.

# मुकेश अंबानी यांनी शपथविधीपूर्वी ट्रम्प यांची घेतली भेट

■ वॉशिंग्टन

भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी आणि त्यांची पत्नी नीता अंबानी यांनी रविवारी अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली आणि त्यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या दुसऱ्या टर्मच्या आधी त्यांचे अभिनंदन केले. उद्या डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे 47 वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेणार आहेत. ट्रम्प यापूर्वी 2016 ते 2020 पर्यंत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते.

रिलायन्स फाऊंडेशनने या भेटीचा व्हिडिओ सोशल मीडिया X वर शेअर करून लिहिले- नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीपूर्वी वॉशिंग्टनमध्ये एका खाजगी स्वागत समारंभात नीता आणि मुकेश अंबानी यांनी त्यांचे स्वागत केले.

नीता आणि मुकेश अंबानींना आशा आहे की, ट्रम्प सरकारच्या काळात भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होतील. यासोबतच त्यांनी ट्रम्प यांना त्यांच्या नवीन परिवर्तनीय कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांनी आज एका खाजगी कार्यक्रमात डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले. रिपोर्टनुसार, शपथविधी सोहळ्यात अंबानी दाम्पत्याला महत्त्वाची जागा मिळणार आहे. ते ट्रम्प मंत्रिमंडळातील नामनिर्देशित सदस्य आणि निवडून आलेल्या अधिकाऱ्यांसोबत बसतील. याशिवाय मंत्रिमंडळाचा स्वागत समारंभ आणि उपराष्ट्राध्यक्षांचा डिनरही होणार आहे, ज्यात अंबानी कुटुंबीय सहभागी होणार आहेत.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर संकल्पभूमी स्मारक कामाची आठवले यांनी केली पाहणी

वृत्तसंस्था
■ वडोदरा

बडोदा येथील सयाजी गार्डन मध्ये ज्या वृक्षाखाली महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण आणि दलितोध्दाराचा संकल्प केला त्या स्थळाला देशभरातील आंबेडकरी जनता संकल्पभूमी म्हणून अभिवादन करते.आज या ऐतिहासीक संकल्पभूनी ला आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी भेट दिली.येथे बाजूला काही अंतरावर सयाजी गार्डन जवळ गुजरात सरकार तर्फे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर संकल्पभूमी स्मारक 26 कोटी खर्च करून भव्य स्तुप अकारात निर्माण करण्यात येत आहे.त्या स्मारक कामाची पाहणी आज ना.रामदास आठवले यांनी केली .हे स्मारक काम लवकर पूर्ण होत असून येत्या 14 एप्रिल भीम जयंती पर्यंत या संकल्प भूमी स्मारकाचे लोकार्पण होईल अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली.



बडोदा येथे उभ्या राहत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संकल्पभूमी स्मारकाचे काम मार्गी लावल्याबद्दल गुजरात चे मुख्यमंत्री भूपेंद्र यादव आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ना.रामदास आठवले यांनी आभार मानले आहेत. देशभरातील आंबेडकरी जनता बडोदा येथील संकल्प भूमी भेट देतात .संकल्प भूमी येथे भव्य स्मारक उभारावे ही गरज ओळखून गुजरात सरकार ने संकल्प भूमी येथे भव्य स्तूप उभारून स्मारक उभारले आहे .प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात अनेक ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भव्य स्मारक उभारली जात आहेत. याचा आम्हाला अभिमान आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले .

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे गुजरात प्रदेश अध्यक्ष अशोक कुमार भट्टी; गुजरात प्रभारी जतिन भुटटा; लीलाबेन वाघेला; राजेंद्र टाक; राजेश गोयल आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

पान 1 वरुन...

## जनमानसात खराब प्रतिमा असणाऱ्यांना पक्षात घ्यायचं नाही - अजित पवार

यावेळी त्यांनी राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्त्यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या. अजित पवार म्हणाले, काहीजण असे आहेत जे काहीच कामाचे नाहीत. त्यांना पक्षात घेऊन उपयोगही नाही. उलट त्या लोकांना आपल्या पक्षात घेतल्यामुळे 'या माणसाला पक्षात का घेतलं?' असा प्रश्न जनता उपस्थित करेल. ते पाहून 'राष्ट्रवादीत काहीतरी वेगळं चालू आहे' अशी चर्चा लोकांमध्ये होऊ शकते. त्यामुळे जनमानसात ज्याची प्रतिमा खराब आहे अशा माणसाला राष्ट्रवादीत घ्यायचं नाही. त्यांना पक्षात अजिबात घ्यायचं नाही. संघटनेत काम करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांकडून कुठलंही गैरवर्तन होता कामा नये. आपल्या नेत्यांमुळे, पदाधिकाऱ्यांमुळे कोणालाही त्रास होता कामा नये. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पुढचा काळ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राहील. गावागावात, चौकाचौकात आपल्या पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. सर्वांनी समन्वयानं कामं केली पाहिजेत. महाराष्ट्राचा विकास सर्वांनी मिळून साधायचा आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आपली जबाबदारी वाढली आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्तानं उमेदवारीसाठी जे इच्छुक आहेत, त्यांनी एक जबाबदार कार्यकर्ता निवडला पाहिजे आणि त्या कार्यकर्त्यानं २५ घरांवर काम कलं पाहिजे. म्हणजे एका घरात ४ मतं धरली तर, १०० मतं मिळतील. आपल्याला अधिकाधिक तरुणांना पक्षात सामील करून घ्यायचं आहे. त्यात डॉक्टर, इंजिनियर, वकील यांचा समावेश असायला हवा, असे पवार म्हणाले.

## मराठी बंधु-भगिनींच्या प्रेमातच राहायचे आहे - मुख्यमंत्री फडणवीस

पॉवर हाऊस असून देश 5 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल. एआय तंत्रज्ञानात आघाडी घेतलेला महाराष्ट्र भारताचे डेटा सेंटर कॅपिटल असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्माकरता लढायला शिकवले, आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी स्वित्झर्लंडसह वैश्विक मराठी परिवारातील मराठी बंधु-भगिनी आमचे राजदूत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. याप्रसंगी बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडचे अध्यक्ष अमोल सावरकर, सेक्रेटरी किर्तीताई गद्रे, महेश बिरादार व इतर मान्यवर उपस्थित होते.

## एरिट्रियाचा बर्हान टेस्फे मॅरेथॉनचा विजेता

प्रत्येकी 10 किलोमीटरच्या टप्प्यांवर दोघांमध्ये फक्त एका सेकंदाचा फरक होता. मात्र, शेवटच्या दोन किलोमीटरच्या अंतरातील अंतिम 50 मीटरमध्ये टेस्फे ने वेग वाढवत अवघ्या 6 सेकंदाच्या फरकाने पहिल्यावहिल्या विजेतेपदावर नाव कोरले. मागील हंगामात वर्चस्व राखलेले इथियोपियाचे खेळाडू यंदा मागे पडले. गतविजेता लेमी बर्हानू (2:14:25 सेकंद) सहाव्या स्थानावर फेकला गेला. त्याचे सलग तिसऱ्या जेतेपदाचे स्वप्न भंगले एलिट महिला गटात केनियाच्या टेलीने अव्वल स्थान राखताना 2:24:56 सेकंद अशी वेळ दिली. बहारिनची शिताये एशेटे (2:25:29 सेकंद) आणि इथिओपियाच्या मेडिना डेमे आर्मिनो (2:27:58 सेकंद) अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला. तिन्ही विजेत्यांमध्ये फक्त सहा सेकंदाचा फरक आहे.

## खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला विजयी

78-40 च्या स्कोअर लाइनसह अंतिम सामना संपला आणि भारतीय महिला संघ पहिला विश्वचषक विजेता ठरला. 19 संघांमध्ये अपराजित राहिले महिला गटात 19 संघ सहभागी झाले होते. भारतीय महिला इराण, मलेशिया आणि दक्षिण कोरियासह अ गटात होत्या. संघाने दक्षिण कोरियाचा 176-18, इराणचा 100-16 आणि मलेशियाचा 100-20 अशा मोठ्या फरकाने पराभव केला. या संघाने गटात अव्वल स्थान पटकावले आणि उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. उपांत्यपूर्व फेरीत भारताने बांगलादेशचा 109-16 अशा फरकाने पराभव केला. उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना 66-16 असा जिंकला. अंतिम फेरीतही भारतीय महिलांचे वर्चस्व दिसून आले आणि संघाने 78-40 अशा फरकाने सामना जिंकला. संपूर्ण स्पर्धेत नेपाळ हा एकमेव संघ होता, ज्याचे भारताविरुद्धच्या पराभवाचे अंतर 50 गुणांपेक्षा कमी होते. भारताने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा 66-16 अशा फरकाने पराभव केला. पुरुष संघाचाही अंतिम फेरीत नेपाळशी सामना होत आहे खो-खो विश्वचषकाच्या पुरुष आणि महिला अशा दोन्ही स्पर्धांमध्ये भारताचे वर्चस्व राहिले. पुरुष संघानेही अपराजित राहून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नेपाळचा या स्पर्धेतील एकमेव पराभव ग्रुप स्टेजमध्ये भारताविरुद्ध झाला होता. भारताच्या गटात पेरू, ब्राझील, भूतान आणि नेपाळ यांचा समावेश होता. संघाने नेपाळचा 42-37, ब्राझीलचा 66-34, पेरूचा 70-38 आणि भूतानचा 71-34 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत भारताने श्रीलंकेवर 100-40 अशा फरकाने विजय मिळवला. त्याचवेळी संघाने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा 62-42 असा पराभव केला.

# रोजगार, पाणी, वीज प्रश्नांबाबत माजी नगराध्यक्ष राम पातकर यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

वृत्तसंस्था
■ बदलापूर

बदलापूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राम पातकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बदलापूर शहरातील विविध प्रश्न तसेच प्रलंबित विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा केली आहे.

इथेनॉल निर्मितीचा प्रस्ताव

तरुण पिढीला रोजगार मिळावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींजीनी केंद्र सरकारची स्टार्टअप इंडिया योजनेला प्राधान्य दिले. स्टार्टअपच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध होत आहे. त्या माध्यमातून आजची तरुण पिढी नवनवीन संशोधन करत आहे.आपल्याला पेट्रोल, डिझेलसाठी परदेशावर अवलंबून राहावे लागते. मक्यापासून इथेनॉल तयार होते.

इथेनॉल उत्पादनाला अधिक चालना मिळण्यासाठी असे प्रकल्पाचा विचार झाल्यास अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.असे त्यांनी सांगितले आहे. तसेच दुग्धव्यवसायामध्ये आज दुधाचे भाव वाढत आहेत. त्याला कारण असे आहे की, दुग्ध जनावरांचे खाद्य ही महाग झाल्यामुळे दुधाचे भाव वाढले. त्यासाठी मका उत्पादनातून दोन्ही गोष्टींसाठी वापर होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.असे त्यांनी सांगितले आहे.



पूर परिस्थितीचे नियोजन बदलापुरात पूर परिस्थितीशी संबंधित प्रत्येक विभागातील तज्ज्ञांची एक वेगळी अभ्यास समिती नेमून या संपूर्ण परिस्थितीचा अभ्यास करावा व बदलापूर शहरातील उल्हास नदीकाठी भिंत बांधणे, नदीत बंधारा बांधून पाणी अडवणे, त्याचा वापर शेती व इतर कामांसाठी करणे, नदीचे पात्र वाढवणे, रेन वॉटर हार्वेस्टिंगसारखे प्रकल्प राबवणे, नदीचे पाणी धरणात कसे सोडता येईल, यासाठी प्रयत्न करणे, नदीतील गाळ उपसा करणे, यांसारखे अनेक उपाय करून, ही पूरस्थिती कायमस्वरूपी रोखता येऊ शकते, असे राम पातकर यांचे म्हणणे आहे.

तसेच पूर नियंत्रणरेषेच्या विषयासोबतच बदलापूर शहर हे नवी मुंबई शहराशी लवकर जोडले जावे, यासाठी नवीन कासगाव रेल्वे स्टेशन व कासगाव-कामोठे रेल्वे मार्ग निर्मिती करणे, कुळगाव बदलापूर शहरातील पाणी पुरवठा संदर्भात अमृत- २ योजनाविषयी, पोशिर धरण शिलार धरण निर्मिती ज्यांमुळे तिसरी व चौथी मुंबई , ठाणे , रायगड, पालघर जिल्हयाचा पाणी प्रश्न निकाली लागण्यास मदत होईल व उल्हास नदी वरील येणाऱ्या पुराचा प्रश्न ही सुटेल असे यावेळी चर्चा झाल्याचे राम पातकर यांनी सांगितले.

# विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे महत्त्वाचे – राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

प्रतिनिधी
■ पुणे

'विकसित भारताचे स्वप्न आपल्या सर्वांना पूर्ण करायचे आहे. जगातील सर्वात सक्षम देश म्हणून भारताला पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न गरजेचे आहे. आपण समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा ओळखून त्यांना एकत्रित घेऊन पुढे गेलो तर भारत निश्चितच एक आदर्श देश म्हणून जगासमोर येईल. यामध्ये प्रत्येकाचे योगदान महत्वाचे असून कोणतेही काम करताना फळाची अपेक्षा न करता ते काम प्रामाणिकपणे केल्यास यश नक्की मिळेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.

दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणत त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग भवनाच्या वतीने 17 ते 19 जानेवारी या कालावधीत 'पर्पल जल्लोष'



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा समारोप राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार अमित गोरखे, पद्मश्री मुरलीकांत पेटकर, राज्याच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाचे दिव्यांग कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, सल्लागार विजय कान्हेकर, अभिजित मुरुगकर, दिव्यांग संघटनेचे प्रतिनिधी मानव कांबळे, दत्तात्रय भोसले, संगीता काळभोर, राजेंद्र वागचौरे उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशन यांनी दिव्यांगांच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी जे पाऊल उचलले आहे ते कौतुकास्पद आहे. आजचा हा सोहळा म्हणजे दिव्यांग व्यक्तींच्या प्रबळ इच्छाशक्तीचा केलेला सन्मान आहे. असा अनोखा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल मी पिंपरी चिंचवड महापालिकेचे अभिनंदन करतो. पर्पल जल्लोष कार्यक्रम आयोजित करण्यामागे असणारा उद्देश खूप मोठा आहे. याठिकाणी दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था, औद्योगिक संस्था यांच्या स्टॉलला भेट दिली. यावेळी एखाद्या उद्योगाला मानवी भावनांची जोड मिळाली तर प्रगती करणे सहज शक्य होते याचा प्रत्यय आला, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले.

# रत्नागिरीच्या कांबळे कुटुंबियांचे शिवकालीन युद्धकला, मर्दानी खेळ जिवंत ठेवण्याचे मोठे कार्य

**पारंपरिक शिवकालीन युद्धकला, मर्दानी खेळ जिवंत ठेवण्याचे मोलाचे कार्य गेली अनेक वर्षे रत्नागिरी येथील कांबळे कुटुंबीय करत आहेत. दिवंगत महादेव व्यायाम शाळा वेतोशी, रत्नागिरीच्या माध्यमातून हे कार्य गेली अनेक वर्षे सुरु आहे. सध्या या कार्याचा वारसा वस्ताद सुधीर गणपत कांबळे यांनी सुरु ठेवला आहे. सुरुवातीला त्यांचे आजोबा वस्ताद यशवंत कांबळे, वडील वस्ताद गणपत कांबळे, चुलत भाऊ सुहास कांबळे, महादेव कांबळे यांनी या युद्धकला, मर्दानी खेळाची मुहुर्तमेढ रोवली. त्यानंतर वस्ताद मालू भिकाजी कांबळे, वस्ताद यशवंत जानू कांबळे, वस्ताद गणपत गोविंद कांबळे, वस्ताद अर्जुन भिकाजी कांबळे, वस्ताद आर. आर. कांबळे, वस्ताद सुहास महादेव कांबळे, वस्ताद गोविंद जानू कांबळे, वस्ताद रघुनाथ सदाशिव कांबळे, वस्ताद बाळू गोविंद कांबळे या सर्व वस्तादांनी देखील मर्दानी खेळाचे जतन करण्यासाठी आपले भरीव योगदान दिले. वस्ताद दिवंगत महादेव व्यायाम शाळा वेतोशी, रत्नागिरी या शाखेच्या प्रमुख पदी सुधीर कांबळे कार्यरत आहेत.**







**सुहास जोशी**
ज्येष्ठ क्रिडा पत्रकार

वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सुधीर कांबळे यांनी आपले आजोबा आणि वडिल यांच्याकडून या युद्धकला आणि मर्दानी खेळाचे धडे गिरवले. ही कला त्यांच्या खानदानातच गेली अनेक वर्षे जोपासली जात आहेत. त्यामुळे साहजिकच छोटा सुधीर या कलेच्या प्रेमात पडला. मग आजोबा वडिलांच्या तालमीत छोटा सुधीर चांगला तयार झाला. मग आपल्याकडची कला इतरांना द्यावी हा ध्यास सुधीरने घेतला. त्यातूनच शिवशंभो मर्दानी आखाडा उदयास आला. आज चार दशके सुधीर कांबळे हे खेळ जिवंत ठेवण्यासाठी आपल्या खिशाला चाट देऊन जिवाचे रान करत आहेत.

युवक क्रीडा मंडळ, मिरजोळे, रत्नागिरी, मीरा-भाईंदर, मुंबई सेंट्रल येथे शिवशंभो मर्दानी आखाडा, संचलित दिवंगत महादेव व्यायाम शाळा वेतोशी, रत्नागिरी, मीरा-भाईंदर महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून अनेक युवा तरुण-तरुणींना स्वसंरक्षणा करीता या कलेचे सुधीर कांबळे प्रशिक्षण देत आहेत. आतापर्यंत ५ हजारपेक्षा जास्त तरुण-तरुणींना त्यांनी या कलेचे प्रशिक्षण दिले आहे. या कलेमध्ये एकूण ५२ विविध प्रकारांचा समावेश आहे. त्यामध्ये बनाटी, बाणा, ढाल, तलवार, थाला, दांडपट्टा, सिंगल पट्टा, डबल पट्टा, सिंगल ढाल-तलवार, डबल ढाल-तलवार, पाचवार काठी, सातवार काठी, तीनवार काठी, झोड काठी, बंदिस्त, सांबरशिंग, आगीचे प्रात्यक्षिक, खंजीर, विटा, काट पवित्रा या काही महत्त्वांच्या प्रकारांचा समावेश आहे.

या एका प्रकारात देखील अनेक सब प्रकार असून त्याची संख्या देखील खूप मोठी आहे. उदा. पट्टाप्रकारात दांडपट्टा, डबलपट्टा ढाल घेऊन, तलवार घेऊन, काठी घेऊन पट्टा फिरवणे असे विविध प्रकार समाविष्ठ आहेत. नारळ फोडणे, कांदा कापणे, काकडी कापणे असे प्रकार देखील पट्ट्यामध्ये येतात. या खेळाच्या जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धादेखील होतात. त्यामध्ये शिवशंभो मर्दानी आखाड्याच्या खेळाडूंचा चांगलाच बोलबाला आहे. अलिबाग येथे झालेल्या लाठी इंडिया स्पर्धेत शिवशंभोच्या खेळाडूंनी पहिला क्रमांक मिळवला. त्यानंतर दिल्लीत झालेल्या आंतरराष्ट्रीय व मार्शल आर्ट ऑलिम्पिक स्पर्धेत देखील त्यांच्या आखाडाच सरस ठरला. गोवा येथे झालेल्या साऊथ एशियन चॅम्पियनशीप स्पर्धेत शिवशंभो मर्दानी आखाड्याला उपविजेतेपद मिळाले. सिलबटम लाठीकाठी स्पर्धेत शिवशंभो मर्दानी आखाड्याच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय ते राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मोठी झेप घेतली. राष्ट्रीय स्पर्धेत दक्षिणेकडच्या राज्यांना मागे टाकून शिवशंभो आखाड्याने बाजी मारली.

आज सिलंबटम लाठीकाठी ही कला दक्षिणेकडच्या राज्यात बरीच प्रसिद्ध आहे. तेथे शाळांमध्ये देखील लाठीकाठीचे प्रशिक्षण दिले जाते. शूलप्रताप आरगडे, अथर्व कांबळे, सारा कांबळे, विश्वनाथ नाईक, आर्या परब, सिद्धी परब, अथर्व जाधव, हिरण्या शेगडे, शार्दुल सावंत, शरयु सावंत, शुभ्रा सावंत, वेदांत विचारे, कौत्सुभ साळोसकर, ओम बिराजदार, विस्मया शिंदे, दिक्षा मदन, प्रथमेश बागलकर, गौराश सावर्डेकर, दैविक सावर्डेकर या शिवशंभो मर्दानी आखाड्याच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करुन आपल्या आखाड्याचे नाव मोठे केले. अवघ्या ५ वर्षाच्या ओम धावडेने ही कला चांगलीच आत्मसात करून सर्वांची शाब्बासकी मिळवली आहे. त्याचे काही व्हिडिओ देखील आहेत. आतापर्यंत आखाड्यातर्फे ५० पेक्षा जास्त ठिकाणी या कलेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली आहेत. त्यामध्ये लहानापासून मोठ्यांपर्यंतचा सहभाग असतो. या थरारक प्रात्यक्षिकांना सर्वत्रच शाबासकीची मोठी पावती मिळाली आहे. या प्रात्यक्षिकांचे देखणे, सफाईदार सादरीकरण बघून बघणारे अचंबित होतात. मीरा- भाईंदर आणि मुंबई सेंट्रल येथे आखाड्यातर्फे या कलेचे नियमित प्रशिक्षण दिले जाते. तेथे युवा-युवतींचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. दोन्हीकडे शंभरपेक्षा जास्त मुलं-मुली या कलेचे धडे घेत आहेत. दररोज तीन तास कसून सराव दोन्ही ठिकाणी सुरू असतो. मीरा-भाईंदर महानगर पालिकेने एक हॉल प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून दिला आहे. तर मुंबई सेंट्रल येथे बॉम्बे वायएमसीएने हॉल उपलब्ध करून दिला आहे.

सध्या बऱ्याच शाळांमधून प्रशिक्षणासाठी कांबळे यांच्याकडे विचारणा होत आहे. मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे मोठे सहकार्य आखाड्याला मिळाले आहे. पालकांचे देखील उत्तम सहकार्य कांबळे आणि त्यांच्या टीमला मिळत आहे. भविष्यात मीरा-भाईंदर महानगरपालिकेने हा हॉल आखाड्याला कायम स्वरुपी उपलब्ध करुन दिला तर अजून मोठ्या प्रमाणावर युवा-युवतींना प्रशिक्षण देता येईल असे सुधीर कांबळे यांना वाटते. सुधीर कांबळे यांना विश्वनाथ नाईक, शुल्मताप अरघडे, अथर्व कांबळे, संजय तांबे, विनोद धावडे, प्रियांका कदम, दिपक सावंत, वैशाली विचारे, मेघा सालसकर प्रणाली चव्हाण, विनोद मदन, राजेश जाधव या सहकाऱ्यांची मोठी मदत होत आहे.

ही युद्धकला आणि मर्दानी खेळ शिकणे तेवढे सोपे नाही, त्यासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तुम्ही कणखर असायला हवे, तसेच विलक्षण एकाग्रतेची देखील मोठी गरज आहे. कारण प्रतिस्पर्ध्याचा वेध घेताना तुमच्याकडे अचुकता आणि एकाग्रता या दोन गोष्टी असणे खूप महत्त्वाच्या आहेत. आता या कलेसाठी लागणारी साधनसामुग्री खूप महागडी आहे. चांगल्या दांडपट्ट्याची किंमत साधारण २० ते २५ हजार रुपये आहे. कोल्हापूर, कऱ्हाड, सातारा येथे या कलेतील साधने उपलब्ध आहेत. ती बनवायची असल्यास तयार करणाऱ्याला नारळ, शाल, रक्कम देऊन त्याला बनवण्यास सांगण्याची परंपरा आहे. आता आपल्या येथे देखील लाठीकाठी प्रशिक्षण सुरु करण्याचा जीआर निघाला आहे. ही गोष्ट या कलेचे संवर्धन होण्यासाठी महत्त्वाची असल्याचे सुधीर कांबळे यांचे मत आहे.

स्वतः उत्तम खेळाडू, प्रशिक्षक असलेले सुधीर कांबळे मर्दानी खेळाचे वस्ताद असून सिलबटमचे राज्य संघटनेचे अध्यक्ष आहेत तसेच लाठी इंडिया मीरा-भाईंदरचे अध्यक्ष असून, मुंबई सेंट्रल मर्दानी खेळाचे वस्ताद आहेत. आगीची थरारक प्रात्यक्षिके करण्यात कांबळे यांचा हातखंडा आहे. भविष्यात ही कला जागतिक पातळीवर नेण्याचे कांबळे यांचे स्वप्न आहे. तसेच आजच्या कठीण काळात जास्तीत जास्त जणांना स्वसंरणाचे धडे देऊन त्यांना आणखीन सक्षम करण्यासाठी सुधीर कांबळे यांचे प्रयत्न कायम सुरुच राहणार आहेत.

---




# तिलारी ते मुळशी सहजीवनाची तेवीस वर्षे....

**संपत देसाई**

१९ जानेवारी २००२ ला सत्यशोधक पध्दतीने आमचं लग्न झालं. १९ जानेवारी २००३ आमच्या लग्नाचा पहिला वाढदिवस. त्यात मुलीचा जन्म ७ जानेवारी २००३ ला झाल्याने तिच्या बारशाच्या दिवस पण त्याच तारखेला. पण नेमकं त्याच दिवशी तिलारी धरणावर धरणग्रस्तांचं आंदोलन ठरलेलं. पुनर्वसनाचं काम तसंच ठेऊन धरणाच्या घळ भरणीचं काम पोलीस बंदोबस्तात सुरू झालेलं. डॉ भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली काम बंद करण्यासाठी त्याच दिवशी मोर्चा ठरलेला. लेकीचं बारसं आणि लग्नाचा पहिला वाढदिवस म्हणून तिचे आईवडील केक घेऊन गावी आलेले. मी सकाळी लवकर उठलो. लेकीचं बारसं नंतर करू आणि लग्नाचा वाढदिवस वैगेरे इतकं कांही महत्वाचं नसतं, जिथं लोक लढताहेत तिथं माझं असणं आज महत्वाचं आहे म्हणून तिच्याशी बोलून मी तिलारी धरणग्रस्तांच्या आंदोलनाला निघून आलो. आंदोलन यशस्वी झालं, पुनर्वसनाचा कालबध्द कार्यक्रम ठरला. आंदोलन संपवल्यानंतर सावंतवाडी येथे होणाऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाची तयारी बैठक करून मी गावी आलो तर मनीषा छोट्या बाळाला घेऊन रागाने माहेरी निघून गेली. लेकीचं बारसं आणि लग्नाचा वाढदिवस दोन्हीही राहून गेलं. पुढे तीनचार महिन्यांनी चळवळीतील कार्यकर्त्यांनी व माझ्या मित्रांनी बारसं घालून लेकीचं नावं मुक्ता ठेवलं. गेल्या बावीस वर्षात अनेक वेळा माझे, तिचे, लेकीचे आणि



लग्नाचे वाढदिवस आम्ही एकत्र साजरे करू शकलो नाही. पण जेंव्हा जेंव्हा शक्य असेल तेंव्हा तिघांनी सगळेच वाढदिवस एकत्र साजरे केले. कांहीवेळा आंदोलनात वाढदिवस साजरा केला.

यावर्षी १८ जानेवारीला मुळशी धरणाच्या सत्याग्रहाला १०० वर्षे झाली म्हणून डॉ बाबा आढाव, डॉ भारत पाटणकर आणि मेधा पाटकर यांच्या उपस्थितीत अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेचे आयोजन केलं होतं. मी या परिषदेत एका परिसंवादात होतो. सर्दी, अंगात कणकण आणि घसा दुखत असल्यानं जायचं का नाही अशा विचारात होतो. तिचं म्हणाली तुम्हाला परिषदेला जायचं आहे ना डॉक्टरकडे जाऊन गोळ्या घेऊन या, कोल्हापुरात आदल्या दिवशी मुक्काम करा, हवतर त्याही दिवशी थांबा. उगाच १९ जानेवारी लग्नाचा वाढदिवस आहे म्हणून धावपळ करून येऊ नका. चळवळ अशी परिवर्तन घडवून आणते आणि जगणंच बदलवून टाकते.

---

# गुंतवून ठेवणारी पोलिसी कथा...

**चित्रपट - जिलबी**
**निर्माते - आनंद पंडित, रुपा पंडित**
**दिग्दर्शन - नितीन कांबळे**
**कलाकार - स्वप्नील जोशी, प्रसाद ओक, शिवानी सुर्वे, पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य.**
**क्रिएटिव्ह दिग्दर्शन - राहुल व्ही. दुबे**
**कथा-पटकथा-संवाद - मच्छिंद्र बुगडे**
**छायांकन - गणेश उतेकर**
**कलादिग्दर्शन - कौशल सिंग**



**नितीन फणसे**
(रंगतरंग)

**कथानकात** संघर्ष असेल तर ते पाहायला मजा येते. म्हणूनच तर खास मनोरंजन म्हणून प्रेक्षक हिंदी चित्रपटांनाच पसंती देतात. गुंतागुंतीची कथा, हिंदीच्या तोडीचे भन्नाट सादरीकरण, उद्योग क्षेत्रात चेअरमन बनण्याची लालसा, पोलिसी क्षेत्राची काळी बाजू वगैरे सगळं काही असल्यामुळे शुक्रवारी प्रदर्शित झालेला 'जिलबी' हा सिनेमा कमालीचा थरारक झाला आहे. नेहमी रोमँटिक भूमिकांमध्येच दिसणारा स्वप्नील जोशी यावेळी थंड डोक्याने क्रूर कामे करणारा एसीपी दाखवण्यात आल्यामुळे उत्सुकता आणखी वाढते.

सुभेदार घराण्यात वडिलांच्या निधनानंतर सौरव आणि गौरव हे जुळे भाऊच (प्रसाद ओक) कारभार पाहात आहेत. मोठ्या सौरवची पत्नी जान्हवी (शिवानी सुर्वे). तिचं धाकट्या गौरवशी सूत जुळलेलं. सिनेमा सुरू होतो तो सौरव-गौरवची बहीण नेहा (अश्विनी चावरे) हिच्या पतीचा खून होताना दिसतो. तो कुणी केला, का केला याचा शोध घ्यायला एसीपी विजय करमरकर (स्वप्नील जोशी) तपास सुरू करतो. या तपासातून काही गोष्टी त्याच्यासमोर येतात. पण यातच एका मोठ्या चुकीचे खापर कमिशनर स्वत:वर घेत आत्महत्या करतात. ते एसीपी विजयचे वडील आहेत. वडिलांच्या मृत्यूनंतर पोलीस खात्यात विजयला सांभाळून घेणारे कुणी उरत नाही. यामुळे सुभेदार घराण्याचे प्रकरण 20 दिवसांत उकलण्याचा त्याच्यावर दबाव येतो. आता मुळातच चुकीच्या मार्गाने हवं तसं वागणारा इन्स्पेक्टर विजय करमरकर या प्रकरणाचा छडा कसा लावतो ते पाहणं उत्कंठावर्धक झालंय.

'एक शून्य शून्य', 'सीआयडी' वगैरे पोलिसी कथा टीव्हीवर पाहण्यात ज्यांना प्रचंड रस आहे त्यांना आनंद पंडित मोशन पिक्चर्सची निर्मिती असलेला हा सिनेमा नक्की आवडेल. गूढ उकलताना विजयची होणारी कसरत पाहायला मजा येते. दिग्दर्शक नितीन कांबळे यांनी पडदा सतत हलता ठेवण्यात यश आले आहे. यामुळे प्रेक्षकांना इकडे तिकडे विचार करण्यासाठी क्षणाचीही उसंत मिळत नाही. सतत काही ना काही घटना घडतच राहतात. सुभेदार घराण्याच्या उद्योगाचे चेअरमन पद मिळवण्यासाठी एकमेकांवर कुरघोडी सुरू राहतात. पण यामागचा खरा सूत्रधार कोण आणि तो कशासाठी हे सर्व करतो हे काही केल्या कळत नाही.

अभिनयाबाबत म्हणायचं तर प्रसाद ओक याने सौरव आणि गौरव या दोन भूमिका कमालीच्या साकारल्या आहेत. दोन्ही व्यक्तिरेखांचे वागणे बोलणे, हावभाव पूर्णपणे वेगळे ठेवण्यात तो यशस्वी झालाय. हाच प्रसाद ओक काहीच महिन्यांपूर्वी धर्मवीर आनंद दिघेंच्या भूमिकेत दिसला होता हे सांगूनही खरं वाटत नाही. स्वप्नील जोशीचा तर प्रश्नच नाही. कुठलाही सिनेमा तो एकट्याने आपल्या खांद्यावर पेलू शकतो हे त्याने आणखी एकदा सिद्ध केलंय. निबर पोलीस अधिकाऱ्याची थंड नजर त्याच्या डोळ्यात दिसते. फायद्यासाठी तो कुठल्याही थराला जाऊ शकेल याची प्रचिती त्याची ही नजरच देते. जान्हवी सुभेदार म्हणून शिवानी सुर्वेनेही आपली अभिनय क्षमता दाखवली आहे. अन्य भूमिकांत पर्ण पेठे (रुबीना), गणेश यादव (पाटील), प्रणव रावराणे (पप्पू), अश्विनी चावरे (नेहा झुंजारराव), प्रियांका भट्टाचार्य (मिष्टी) या सर्वांचेच काम उत्तम झाले आहे.

नितीन कांबळे यांचे दिग्दर्शन चांगले आहे. यापूर्वी त्यांनी 'वेलडन भाल्या', 'कॉफी', 'धो धो पावसातली वन डे मॅच', 'शिरपा' वगैरे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. मात्र काही गोष्टी या चित्रपटात खटकतात. सौरव गौरवला फोन करून पार्टीला यायला सांगतो. तो येत नाही तेव्हा वहिनीशी बोल सांगून सौरव आपला फोन जान्हवीला देतो. हा फोन सौरवचा असतानाही त्यावर जान्हवी आणि गौरव हे दोघे प्रेमाच्या गोष्टी कशा करू शकतात. सहसा कुठल्याही फोनवर रेकॉर्डिंगची सुविधा असते. यामुळे ही बाब खटकल्यावाचून राहात नाही. असो. अशा एकदोन चुकांकडे दुर्लक्ष केले तर सिनेमा पाहताना मजा येते हे नक्की.

कथा आणि पटकथेत एक प्रकारचा खास वेग आहे. पोलिसी कथानकाला तो वेग हवाच असतो. तो नसता तर गुंतागुंत वाढलीच नसती. उत्तम कथा, पटकथा व परफेक्ट संवादांचे श्रेय मच्छिंद्र बुगडे यांना द्यावेच लागेल. गणेश उतेकरांचे छायांकनही त्याच तोडीचे वेगवान झाले आहे. एकूणच वेगवान कथा आणि समर्पक दिग्दर्शनामुळे हा सिनेमा किमान एकदा तरी नक्कीच पाहण्यासारखा आहे.

---

# मिठाईची जागा 'केक' घेत आहे का ?

**आपल्या** आनंदात इतरांनाही सामावून घेण्यासाठी मिठाई वाटून इतरांचेही तोंड गोड करण्याची पद्धत अगदी पुराणकाळापासून चालत आलेली आहे. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी प्रजेला हत्तीवरून मिठाई वाटत असत. मिठाईचे सतराशे शहाण्णव प्रकार आपल्याकडे उपलब्ध आहेत. देवी-देवतांच्या उत्सवांना नैवेद्य म्हणून ५६ भोग देण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. उत्तर भारतात ही परंपरा आजही उत्साहाने जपली जाते. आनंदाचे क्षण हे साजरे करण्यासाठीच असतात. इतरांचे तोंड गोड करून आपला आनंद साजरा केल्याने त्यामध्ये इतरही सहभागी होतात ज्यामुळे वातावरणात आनंद लहरी पसरून वातावरणही आनंददायी होते. त्यामुळे आनंद साजरा करण्याची प्रथा जगभरात सर्वच प्रांतांत दिसून येते.

आजमितीला बहुतांश पालक आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालतात. आपले मूल कमावते झाल्यावर स्पर्धात्मक जगात ते मागे राहू नये. इंग्रजीवर त्याचे प्रभुत्व असावे यासाठी हा सारा खटाटोप असतो. केवळ इंग्रजीवर प्रभुत्व राहावे या उद्देशाने मुलांना कॉन्व्हेंट शाळांत घालणारे पालक संपूर्ण शालेय जीवनात पाल्यांवर कोणत्या संस्कृतीचे संस्कार होणार आहेत याबाबत मात्र अनभिज्ञच असतात. बहुतांश कॉन्व्हेंट शाळा या ख्रिस्ती संस्थांमार्फत चालवण्यात येत असल्याने या शाळांमधून ख्रिस्ती पंथांचे संस्कारच अधिक केले जातात. या शाळांमध्ये मुलांना कपाळाला तिलक लावण्यास, गळ्यात देवतांचे चित्र घालण्यास मज्जाव केला जातो, मुलींनी कपाळाला बिंदी लावणे, हातांना मेहेंदी लावणे, बांगड्या घालणे यांवर बंदी घातली जाते, मुलींना गुडघ्याच्या वर स्कर्ट घालण्याची सक्ती केली जाते, हिंदू सणांच्या वेळी सुट्टी न देता मुद्दामहून परीक्षा ठेवल्या जातात, गणपती-दिवाळी सणांपेक्षा येथे ख्रिसमस अधिक उत्साहात साजरा केला जातो, आनंदाचे क्षण केक कापून आणि वाटून साजरे केले जातात. पाल्याच्या शिक्षणासाठी कॉन्व्हेंट शाळेची निवड पालकांनीच केलेली असल्याने तेही हे सारे निमूट सहन करतात, मुलांचे मन संस्कारक्षम असल्याने शालेय जीवनात होणारे संस्कारच त्यांच्या अंर्मनात दृढ होतात परिणामी हिंदूंचे सण, प्रथा परंपरा या मुलांना बुरसटलेल्या वाटू लागतात. संस्कृतीप्रेमी संघटनांनी अशा कॉन्व्हेंट शाळांना वेळोवेळी दिलेल्या समजमुळे काही प्रमाणात फरक पडला असला तरी बहुतांश ठिकाणी हीच परिस्थिती दिसून येते.

सध्याचे बॉलिवुड चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर दिवसागणिक येणाऱ्या वेब सिरीज या सर्वांमध्येही पाश्च्यात्य विकृतीला खतपाणी देणारी दृश्ये सादर केली जातात. यातील नट्या तोकड्या कपड्यांत, मद्यपान करताना वावरताना दिसतात, यातील नट बऱ्याचदा नास्तिक विचारसरणीचा दाखवण्यात येतो. इथे आनंदाचा क्षण मग तो नोकरी लागल्याचा असो किंवा नोकरीत पदोन्नती मिळण्याचा असो, साखरपुडा असो व लग्न असो सर्वच ठिकाणी हे क्षण मद्यपान करून आणि केक कापून साजरे केले जातात. चित्रपट आणि वेब सिरीजचा वाढता प्रभाव आणि शालेय जीवनात होणारे पाश्चात्य संस्कृतीचे संस्कार यांचे पडसाद आता दैनंदिन जीवनावरही पडू लागले आहेत.

**- जगन घाणेकर**

**मुंबई :** शिवसेना नेते, खासदार अनिल देसाई यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक, कला व खेळ महोत्सवाचे शिवसेना नेते,आमदार, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी उदघाटन केले.



### "चिंतामणी चषक - 2025" कबड्डी स्पर्धा

# प्रथम श्रेणी गटात गुड मॉर्निंग स्पोर्टस् विरुद्ध लायन्स स्पोर्टस्, अशी पुरुष अंतिम लढत रंगेल



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवमुद्रा प्रतिष्ठान, नवोदित संघ यांनी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या "चिंतामणी चषक - २०२५" कबड्डी स्पर्धेच्या कुमार गटात अंतिम फेरीत धडक दिली. नुकत्याच प्रभादेवी येथे झालेल्या कुमार गटात हेच दोन्ही संघ एकमेकास भिडले होते. त्यात नवोदित संघाची सरशी झाली होती. प्रथम श्रेणी पुरुष गटात लायन्स स्पोर्टस्, गुड मॉर्निंग स्पोर्टस् संघानी अंतिम फेरीत खेळण्याचा मान पटकाविला. चिंचपोकळी, मुंबई येथील सदगुरू भालचंद्र महाराज क्रीडांगणावर सुरू असलेल्या कुमारांच्या पहिल्या उपांत्य सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने स्थानिक हिंदमाता सेवा मंडळाचा प्रतिकार ४७-३२ असा सहज मोडून काढत धडाक्यात अंतिम फेरी गाठली. आक्रमक खेळाची सुरुवात करीत शिवमुद्राने २ लोण देत पूर्वार्धात २७-१४ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात सावध प्रवित्रा घेत आपला विजय निश्चित केला. उत्तरार्धात हिंदमाताने थोडा प्रतिकार करीत एका लोणची परतफेड करीत पराभवातील अंतर कमी केले. मित कदम, राकेश धामी यांच्या चढाई पकडीच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाला शिवमुद्रा संघाला विजयाचे श्रेय जाते. हिंदमाताची सुरुवातच ढळमळीत झाल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

याच गटात नवोदित संघाने अमर मंडळाला ४४-२८ असे लीलया पराभूत करीत अंतिम फेरी गाठली. सावध सुरुवात करीत लोण देत २२-१५ अशी आघाडी घेणाऱ्या नवोदितने दुसऱ्या डावात आणखी २लोण देत सामना एकतर्फी केला. अथर्व सुवर्णा, सिद्धेश पाटील यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळामुळे हा विजय सोपा झाला. अमरच्या रमेश रायकर, सागर राजपूत यांची मात्रा या सामन्यात चालली नाही. प्रथम श्रेणी पुरुषांच्या उपांत्य सामन्यात लायन्स स्पोर्टस् ने जय भारत क्रीडाचा प्रतिकार ३१-२१ असा संपवित अंतिम फेरी गाठली. अत्यंत सावधपणे खेळल्या गेलेल्या या सामन्यात विश्रांतीला १५-१० अशी लायन्स कडे आघाडी होती. दोन्ही डावात एक-एक लोण देत लायन्सने आपला विजय निश्चित केला. आप्पाजी पाटील, हर्ष मोरे यांच्या दमदार चढाया, त्यांना बाजीराव होडगे, शुभम मटकर यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हे शक्य झाले. अनिकेत मिटके, निखिल पाटील यांचा खेळ जय भारत संघाचा पराभव टाळण्यास कमी पडला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्टस् ने गोलफादेवी सेवाचा २८-२३ असा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली. पहिल्या डावात लोण देत गुड मॉर्निंगने १५-०५ अशी आघाडी सहज घेतली. पण दुसऱ्या डावात सुर सापडलेल्या गोलफादेवीने तुफानी खेळ करीत ही आघाडी कमी करीत आणली. पण वेळेचे गणित चुकल्याने गोलफादेवीला पराभव स्वीकारावा लागला. प्रफुल्ल कदम, तन्मय सावंत, सर्वेश पांचाळ गुड मॉर्निंग कडून, तर धनंजय सरोज, विनम्र लाड, सनी कोळी गोलफादेवी कडून उत्कृष्ट खेळले.

अधिक माहितीकरिता प्रवीण राणे(सहसचिव) भ्रमणध्वनी क्रमांक ९७७३६६१२९३ यांच्याशी संपर्क साधावा.

## फलंदाज रिंकू सिंगचा सपाच्या खासदारासोबत साखरपुडा



**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार फलंदाज रिंकू सिंगचा समाजवादी पक्षाच्या (सपा) खासदार प्रिया सरोज यांच्यासोबत साखरपुडा झाल्याचा बातम्या न्यूज पोर्टल आणि सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. मात्र या दोघांचा साखरपुडा झाला नसल्याची माहिती प्रिया सरोज यांचे वडील तुफानी सरोज यांनी दिली आहे. भारतीय संघाचा स्टार फलंदाज रिंकू सिंगची क्रिकेट चाहत्यांना वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. आयपीएल सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स संघाकडून खेळाताना रिंकू सिंगने चौकार आणि षटकारांची आतषबाजी करत संघाला अनेक सामने जिंकवून दिले आहेत. महत्त्वाचे म्हणजे त्याने एका सामन्यात सलग कोलकाता संघाकडून खेळताना एका षटकात सलग 5 षटकार मारण्याचा विक्रम आपल्या नावावर केला होता .

### 5वी अजित घोष ट्रॉफी महिला टी-20 क्रिकेट स्पर्धा

# सेजल विश्वकर्मा ६४, श्रावणी पाटील नाबाद ४७ साईनाथ स्पोर्ट्सला विजेतेपद




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सेजल विश्वकर्मा (६४), श्रावणी पाटील (नाबाद ४७) यांच्या शानदार प्रदर्शनाच्या बळावर साईनाथ स्पोर्ट्स क्लबला ५व्या अजित घोष ट्रॉफी महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकवण्यात यश आले. त्यांनी यजमान स्पोर्टिंग युनियन क्लबचा ३५ धावांनी पराभव केला. शेजल आणि श्रावणीच्या दुसऱ्या विकेटच्या ९९ धावांच्या भागिदारीने जणू सामान्याचा निकालच लावला. साईनाथने २० षटकांमध्ये ३ बाद १५१ अशी चांगली धावसंख्या त्यायोगे उभी केली. मात्र शेजलला तिच्या खेळीच्या सुरुवातीलाच जे जीवदान मिळाले, त्याबद्दल साईनाथने प्रतिस्पर्धी संघाचे अवश्य आभार मानले असतील.

श्रावणीने सलामीला येत ५३ चेंडूंमध्ये केवळ ३ चौकार मारत संयमपूर्ण खेळी रचल्याने सेजलला आक्रमणावर भर देता आला. सेजलने ६४ धावा ५४ चेंडूत केल्या. ज्यामध्ये ९ चौकार आणि २ षटकार होते.

स्पोर्टिंगने लक्षाचा पाठलाग करताना छान सुरुवात केली. पहिल्या ६ षटकांच्या "पॉवर प्ले" मध्ये त्यांनी ४७ धावा केल्या. मात्र त्यांच्या प्रांजल मळेकरला विनाकारण "स्टेप-आऊट" होऊन चेंडू फटकाविण्याचा मोह झाला. आणि ती यष्टिचीत झाली. ही चूक फारच महाग ठरली. स्पोर्टिंगने जी लय गमावली त्यानंतर त्यांच्या विजयाच्या आशांना ओहोटी लागली. ध्रुवी पटेल (२६) आणि कश्वी होसाळकर (३०) यांनी प्रतिकार केला खरा पण तो विजय देण्यासाठी पुरेसा नव्हता. अमिषा म्हात्रेने ध्रुवीला आपल्या ऑफ-ब्रेकवर बोल्ड केले आणि स्पोर्टिंगला पराभवाच्या छायेत ढकलले. स्पोर्टिंगच्या दोन खेळाडू धावबाद झाल्या आणि एक यष्टिचीत झाल्याने त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

भामा सी. सी.ची अंजू सिंग (स्पर्धेत सर्वोत्तम), डॅशिंगची खुशी निजाई (सर्वोत्तम फलंदाज) आणि साईनाथची श्रावणी पाटील (उत्तम गोलंदाज) तसेच स्पोर्टिंगची प्रांजल मळेकर (उदयोन्मुख खेळाडू) यांना "अविसा"तर्फे "किट" प्रदान करण्यात आले. एमसीएचे सचिव अभय हडप, मैदानातील कार्यकर्ते नदीम मेमन, ॲपेक्स कौंसिलचे केदार गोडबोले यांची उपस्थिती पारितोषिक वितरण समारंभाला लाभली. तसेच कमल सावंत, रेखा गर्दे या महिला खेळाडू खास पुण्याहून आल्या होत्या.

**संक्षिप्त धावफलक**

साईनाथ स्पोर्ट्स २० षटकांत ३ बाद १५१ धावा (श्रावणी पाटील नाबाद ४७, सेजल विश्वकर्मा ६४) विजयी विरुध्द स्पोर्टिंग युनियन २० षटकांत ७ बाद ११६ (ध्रुवी पटेल २६, प्रांजल मळेकर १४, कश्वी होसाळकर ३०, अमिशा म्हात्रे १२ धावांत २ बळी) सामन्यात सर्वोत्तम : श्रावणी पाटील

## राज्य पातळी आंतर को-ऑपरेटिव्ह बँक क्रिकेट स्पर्धा 8 फेब्रुवारीपासून

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या एकमेव मान्यता प्राप्त को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई तर्फे ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्य पातळी मर्यादित षटकांची आंतर को-ऑपरेटिव्ह बँक टेनिस क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा ८ व ९ फेब्रुवारी रोजी दादर येथे होईल. मुंबई शहर व उपनगरसह ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिक, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी आदी जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह बँकांचे टेनिस क्रिकेट संघ प्रतिवर्षीप्रमाणे सहभागी होण्यासाठी उत्सुक आहेत.

को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन-मुंबई संलग्नीत सहकारी बँकांमधील महाराष्ट्र राज्यातील टेनिस क्रिकेट संघांसाठी ही स्पर्धा मर्यादित आहे. स्पर्धा बाद पध्दतीने होणार आहे. पहिल्या ४ विजेत्या-उपविजेत्या संघांना रोख पुरस्कारासह आकर्षक चषक देऊन अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित संघांनी प्रवेश अर्जासाठी युनियन कार्यालय ( दूरध्वनी: २४३७ १७५५/ ९९६९२ ६५५३८), ८१/८३ शालिनी पॅलेस, भवानी शंकर रोड, दादर-पश्चिम, मुंबई-२८ येथे २१ जानेवारीपर्यंत संपर्क साधावा. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युनियनचे कार्याध्यक्ष सुनील साळवी, सरचिटणीस नरेंद्र सावंत, खजिनदार प्रमोद पार्टे, हाशम धामसकर, प्रकाश वाघमारे, मनोहर दरेकर, राजेश कांबळे, अमूल प्रभू, भार्गव धारगळकर, अशोक नवले, समीर तुळसकर, प्रवीण शिंदे, अमरेश ठाकूर, जनार्दन मोरे आदी पदाधिकारी कार्यरत आहेत.

## मानखुर्द परिसरातून सात किलो गांजासह तिघांना अटक

**मुंबई :** गांजाचा साठा असलेल्या तीन ठिकाणी मानखुर्द आणि देवनार पोलिसांनी छापा टाकून एकूण तीन आरोपींना अटक केली आहे. त्या आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी सात किलो गांजा जप्त केला असून पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत. गोवंडी-शिवाजीनगर आणि मानखुर्द परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी वाढली असून तरुण पिढी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांच्या आहारी जात आहेत. परिमंडळ सहाचे पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी या अमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी एक मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार गुरुवार, शुक्रवार आणि शनिवारी पोलिसांनी मानखुर्द आणि देवनार पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापे घालून गांजाची तस्करी करणाऱ्या तीन आरोपीना अटक केली आहे.

## कामगार नेते कै. डॉ. दत्ता सामंत यांच्या 28 व्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबीर



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विक्रोळी येथील विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचालित विकास कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एन.एस.एस. युनिटतर्फे कामगार नेते कै. डॉ. दत्ता सामंत यांच्या 28 व्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात 871 बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टिळक महाराष्ट्र विद्यापीठ माहिती केंद्राचे संचालक प्रा. विकास प. राऊत यांनी भूषविले शिबिराचे. उद्घाटन डॉ. हरीश पांचाळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नेत्रतज्ञ डॉ. क्षितीज पारीख होते तर विशेष अतिथी डॉ. देवांग शहा व रविंद्र गायकवाड, प्रकल्प प्रमुख, वेस्टेक टेक्नॉलॉजी लिमिटेड हे उपस्थितीत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. पात्रा यांनी महाविद्यालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. डॉ. हरीश पांचाळ यांनी रक्तदानाचे वैज्ञानिक व सामाजिक महत्त्व विषद केले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. विनय राऊत, विश्वस्त डॉ. मेघा शेट्टी हे उपस्थित होते.

एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी व्ही. व्ही. मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ माहिती केंद्राच्या सर्व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे सदर शिबीर यशस्वीपणे पार पडले.

## भायखळा येथील राणीबागेत 31 जानेवारीपासून तीन दिवस पुष्पोत्सव



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सतत धावणाऱ्या मुंबईला आणि कामात व्यस्त असणाऱ्या मुंबईकरांना थोडासा विरंगुळा मिळावा या हेतूने दरवर्षीप्रमाणे यंदाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भायखळा स्थित वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात( राणी बाग )३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत उद्यानविद्या प्रदर्शन अर्थात पुष्पोत्सव भरविण्यात येणार आहे. यंदाचा हा २८ वा पुष्पोत्सव आहे.

विविध प्रजातीची फुलझाडे, फळांची रोपटी, रंगबेरंगी फुलझाडे, औषधी वनस्पती इत्यादी मिळून सुमारे ५ हजार रोपांचा या पुष्पोत्सवात समावेश असेल. आतापर्यंत पार पडलेल्या पुष्पोत्सवांना जपान, मलेशिया, कॅनडा, मॉरिशस या देशांच्या राजदूतांसोबतच अतिरिक्त मुख्य न्यायाधीश मंजुषा देशपांडे, अभिनेता रणजित, पवन मल्होत्रा, एकता जैना, ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसेकर यासारख्या दिग्गजांनी भेट दिली आहे.

फुलझाडे आणि फळझाडांच्या प्रदर्शनासोबतच उद्यानविषयक वस्तुंची विक्री, झाडांसाठी लागणारे खत आदींची दालने याठिकाणीही नागरिक तसेच पर्यावरणप्रेमींनी खुली करण्यात येणार आहेत. सलग तीन दिवस सुरू राहणाऱ्या या पुष्पोत्सवाचा मुंबईकरांनी आनंद घ्यावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात

## धारावीत बॉम्ब असल्याचा निनावी दूरध्वनी

**मुंबई :** धारावीत बॉम्ब असल्याचा निनावी दूरध्वनी मुंबई पोलिसांना आला आहे. धारावी पोलिसांनी त्याची गांभीर्याने दखल घेऊन गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. धारावीच्या राजीव गांधी नगरमध्ये बॉम्ब ठेवल्याचा निनावी दूरध्वनी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला गुरूवारी प्राप्त झाला होता. त्यानंतर तातडीने याबाबतची माहिती स्थानिक पोलीस, गुन्हे शाखा यांना देण्यात आली. त्यांनी सर्व परिसरात तपासणी केली. त्यावेळी माहितीमध्ये तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले. अखेर आरोपीविरोधात शनिवारी धारावी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता ३५३(१), ३५३(३) गुन्हा दाखल केला. शांतता भंग करण्यासाठी खोटी माहिती दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून धारावी पोलीस अधिक तपास करत आहेत. गेल्या वर्षभरात मुंबई पोलिसांना शंभरहून अधिक खोटी माहिती देणारे अथवा धमकीचे दूरध्वनी आले आहेत. त्यात मंत्रालयात बॉम्ब ठेवल्याचा निनावी दूरध्वनी ११२ क्रमांकाच्या हेल्पलाईनवर आला होता. निनावी दूरध्वनी करून आरोपीने मंत्रालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली होती. निनावी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने मुख्यमंत्र्यांशी बोलणे करुन देण्याची इच्छा केली व्यक्त केली. बोलणे करुन दिले नाही तर बॉम्बद्वारे मंत्रालय उडवून देण्याची दिली धमकी दिली होती. त्यानंतर मंत्रालयात बॉम्बशोध पथक दाखल झाले. त्यांनी मंत्रालयातील मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या दालनाजवळील परिसराची विशेष तपासणी केली.

### स्तनाच्या 'कॅन्सर'विरोधातील लढ्याला यश

## 'शाश्वी'च्या सोल्युशनद्वारे कॅन्सरच्या पेशी 72 तासांमध्ये होऊ शकतात नष्ट

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शाश्वी रेमेडीजने स्तनाच्या कॅन्सरवरील उपचारांमध्ये क्रांती घडवून आणणारे नवे फॉर्म्युलेशन विकसित केले आहे. हे "फॉर्म्युलेशन" म्हणजे जगभरातील महिलांना सर्वात जास्त भेडसावणाऱ्या आजाराविरोधातील लढ्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

सध्या स्तनांच्या कॅन्सरने फुफ्फुसांच्या कॅन्सरलादेखील मागे टाकले आहे. संस्थापक सोनल बन्सल, ए के बन्सल आणि सह-संस्थापक बिरेंद्र सिंग नेगी, डॉ किरण, दिगंत शर्मा यांच्या नेतृत्वाखाली गेली दहा वर्षे करण्यात आलेल्या सखोल संशोधनाचे फळ म्हणजे हे फॉर्म्युलेशन आहे. मुंबईतील एका प्रतिष्ठित सरकारी संस्थेमध्ये करण्यात आलेल्या इन-विवो सेफ्टी स्टडीमध्ये असे नोंदवण्यात आले आहे की, हे सोल्युशन निरोगी पेशींसाठी १००% सुरक्षित आहे, त्यामुळे कॅन्सर उपचारांमध्ये हा एक लक्षणीय विकास म्हणता येईल.

जागतिक आरोग्य संघटना आणि ऑन्कोलॉजी रिसर्च एजन्सीनी नुकत्याच प्रकाशित केलेल्या संशोधन अहवालानुसार, जगभरातील महिलांना होणाऱ्या एकूण कॅन्सरपैकी २५% हुन जास्त आणि भारतामध्ये ३०% हुन जास्त केसेस स्तनांच्या कॅन्सरच्या आहेत. कॅन्सर केसेसचा वार्षिक दर जगभरात ११.६% असल्याचे देखील या अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## 'एचडीएफसी'च्या 1500 कर्मचाऱ्यांनी मुंबई मॅरेथॉन 2025 मध्ये घेतला भाग

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

एचडीएफसी बँकेच्या 'व्हिजिल आंटी' समूहाच्या नेतृत्वाखाली बँकेच्या जवळपास १५०० कर्मचाऱ्यांनी या वर्षी टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये भाग घेतला. या कर्मचाऱ्यांनी घातलेले 'गेट सेट एज्युकेट' हा संदेश असलेले टीशर्ट्स शिक्षण संसाधनांपर्यंत पोहोच वाढवण्यात मदत करण्याप्रती बँकेची वचनबद्धता दर्शवत होते.

१५ व्हिजिल आंटी इन्फ्ल्यूएंसर्सनी देखील एचडीएफसी बँकेच्या कर्मचाऱ्यांसोबत मॅरेथॉनमध्ये भाग घेतला. धोके आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याबाबत आणि सुरक्षित बँकिंगबद्दल जागरूकता वाढवण्याचा उद्देश घेऊन टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेले हा आजवरचा सर्वात मोठा कॉर्पोरेट ग्रुप आहे. कर्मचाऱ्यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट एनजीओच्या समर्थनार्थ या उपक्रमामध्ये भाग घेतला होता. ही एनजीओ महाराष्ट्रातील ग्रामीण शाळांमधील शाळा सोडाव्या लागण्याच्या धोक्याच्या कक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी प्रदान करण्यासाठी समर्पित एक संघटना आहे.







**मुंबई ।** मैत्रेय फाउंडेशन सायन ब्लड बँक ह्यांनी संस्थेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेऊन शिवआरोग्य सेनेचे मुंबई जिल्हा संपर्क समन्वयक अमोल वंजारे व मुंबई सह समन्वय प्रकाश वाणी ह्याचा सन्मान केल्याबद्दल शिव आरोग्य सेनेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. शिवआरोग्य सेना महाराष्ट्र कार्याध्यक्ष डॉ.किशोर ठाणेकर , महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ. जयवंत गाडे, भायखळा विधानसभा समन्वयक राजाराम झगडे, चंद्रकांत हळदणकर, सिने कलाकार मिलिंद गवळी तसेच समाजातील अनेक मान्यवर व्यक्ती व पदाधिकारी , संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वीटाफूड्स इंडिया 2025 एक्स्पोमध्ये 136 देशी आणि 23 आंतरराष्ट्रीय प्रदर्शकांचा सहभाग

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतातील आघाडीचे प्रदर्शन आयोजक वीटाफूड्स इंडियाची तिसरी आवृत्ती ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान जियो वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, मुंबई येथे आयोजित करणार आहे. हा कार्यक्रम न्यूट्रास्युटिकल, फंक्शनल फूड आणि डायटरी सप्लिमेंट इंडस्ट्रीमधील नेते, प्रभावशाली आणि धोरण निर्मात्यांना एका व्यासपीठावर एकत्र आणेल. यावर्षी वीटाफूड्स इंडिया १३६ देशी आणि २३ आंतरराष्ट्रीय प्रदर्शकांचा सहभाग आणि ३५ हून अधिक तज्ञ वक्त्यांकडून १९ शैक्षणिक सत्रे पाहतील जे उद्योगाच्या भविष्याबद्दल विचार मांडतील. या कार्यक्रमास ८००० हून अधिक अभ्यागत पोहोचतील अशी अपेक्षा आहे.

प्रदर्शनाचे आयोजक इन्फोर्मा मार्केट्स इन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक योगेश मुद्रास यांच्या मते, "वाढत्या आरोग्याविषयी जागरूकता वाढल्याने न्यूट्रास्युटिकल क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. वयानुसार लोक लठ्ठपणा आणि हृदयविकारांपासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांना उपाय हवे आहेत, जीवनसत्त्वे आणि हर्बल अर्क यांसारख्या रोग प्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पूरक आहारांची मागणीही वाढत आहे.



## सुविचार

पूर्णविराम म्हणजे शेवट नाही. कारण आपण त्यानंतर नवीन वाक्य लिहू शकतो. त्याचप्रमाणे जीवनात अपयश आले. तर तो खरा शेवट नसतो. तर ती नव्या यशाची सुरुवात असते.

# " ठकी " कायमची हरवलेली जुनी लाकडी बाहुली

**पूर्वी लहान मुलं भातुकलीचा खेळ खेळत असत. भातुक या शब्दाचा अर्थ खाऊ असा आहे ! भगवान श्रीकृष्णाच्या बालपणातील विटी दांडू आणि चेंडू, सुमारे 5000 वर्षांपूर्वी मोहेंजोदारो मध्ये सापडलेली मातीची खेळणी, एका इटालियन बेटावर 4000 वर्षांपूर्वी सापडलेली दगडी बाहुली, ग्रीस - चीन - रोममध्ये सापडलेली खेळणी ही माणसाच्या या अशा क्रीडा प्रेमाचे विश्वरुप दर्शन घडवितात.**

लेखक
**मकरंद करंदीकर**

आपल्याकडे पूर्वी प्रत्येक घरातील स्वयंपाक या विभागाचे प्रमुखपद हे नात्याने, वयाने ज्येष्ठ असलेल्या स्त्रीकडे आपोआपच यायचे. शालेय शिक्षणाचा प्रसार कमी होता. पुढच्या पिढीला पारंपरिक ज्ञान हे घरातूनच मिळायचे. मुलींना ते घरातील स्त्रियांबरोबर वावरतांना मिळत असे. खेळामध्ये मातीची भांडी, लाकडी बोळकी - बुडकुली असायची. या खेळण्यांच्या साहाय्याने घरातील मोठ्या स्त्रिया जशा वागतात तसे वागण्याचा प्रयत्न म्हणजे पूर्वीचा भातुकलीचा खेळ ! आपल्याकडे पूर्वी घरोघरी ठकी नावाची, लाकडाची एक ओबडधोबड बाहुली असायची. एका लाकडाच्या त्रिकोणी ठोकळ्यातून ही ठकी कोरली जात असे. अनेकदा ही ठकी ठसठशीत कुंकू लावलेली, लुगडे नेसलेली, नाकात नथ व डोक्यात फुलांची वेणी घातलेली असे. तरीही या बाहुलीला अंघोळ घालणे, कपडे घालणे, दूध पाजणे, भरविणे, झोपविणे हा त्यावेळच्या मुलींच्या खेळण्याचा भाग असे. कांही ठिकाणी ही ठकी रंगविलेली असायची. ठकी, ठेंगणी - ठुसकी, ठकूताई, ठमाबाई, ठेंगाबाई अशी मराठीतील ठ वरून सुरु होणारी नावे आणि विशेषणे या बाहुलीसाठी कायमची राखीव असत. ठकी




ही फारशी स्मार्ट वगैरे न वाटता कांहीशी गावंढळ, मंद, ढ वाटत असे. त्या काळात शिक्षणामध्ये फारशी गती नसलेल्या मुलींचे लग्न लवकर उरकून टाकत असत. सर्वात महत्वाचे म्हणजे अस्सल मराठी बाहुलीचे रुप ल्यालेली ही ठकी बाहुली अशा मुलींचे एक प्रतीक ठरले होते. पुलंचे चितळे मास्तर हे त्यांच्या वर्गातल्या गोदी गुळवणीला गोदाक्का म्हणून हाक मारीत असत. तिचे वर्णन या ठकीला साजेलसे आहे. अशा ठक्या संसार मात्र चांगला करीत असत. ठकीची घराघरातील एकच बाहुली ही अनेक वर्षे लहान मुलींना खेळायला पुरत असे. पण ती फारच तुटकी फुटकी झाली तर तिचा उपयोग जात्याचा खुंटा ठोकणे, कुणाला तरी फेकून मारणे असल्या हलक्यासलक्या कामांसाठी केला जात असे. परंपरांच्या चाकोरीतच अडकलेल्या स्त्रीचे प्रतीक म्हणून ठकीचे छायाचित्र अनेक पुस्तकांमध्ये, मुखपृष्ठांवर पाहायला मिळते. दूरदर्शनवरील वृत्त निवेदिका आणि विविध कार्यक्रम सादर करणाऱ्या सौ. दिपाली केळकर यांनी ठकी, भातुकली, भातुकलीची विविध छोटी भांडी, खेळणी इत्यादींवर आधारित, " खेळ मांडीयेला " हे एक सुंदर पुस्तक लिहिले आहे.

भातुकली या खेळात केव्हांतरी एकदा बाहुला बाहुलीच्या लग्नाचा कार्यक्रम होत असे. फक्त मुलींच्या या खेळात मग अशा वेळी भटजी, वऱ्हाडी म्हणून मुलगेही सामील होत असत. या ठकीला नवरा म्हणून मग एक तितकाच ओबडधोबड बाहुला असायचा. त्याचे नावही देवजी घासाड्या, ठोंब्या, ठक्या असे काहीतरी असायचे. आपली आई, आजी, आत्या, मावशी या दिसायला रूपवान असणे कधीच अपेक्षित नसते. तसेच या ठकीचे सुद्धा होते. ती भलेही सुंदर नसेल पण तिचे अस्तित्वच खूप सुंदर होते, भावपूर्ण होते. अनेक मुलींना तिने मोठे होताना पाहिलेले होते. ठकी ही केवळ एक बाहुली नसून ती अनेक पिढ्या, मुलींशी गुजगोष्टी केलेली एक संस्कृती होती.

अशा या ठकीची गरज आणि अस्तित्व जगभर होते,असे दिसते. भारतातच अनेक प्रांतांमध्ये अशा त्रिकोनी आकारात साकारलेल्या अनेक बाहुल्या आढळतात. ( सोबतचे फोटो अवश्य पाहा ). पण ठकीच्या तुलनेत त्या सौंदर्यवती दिसतात. रशियन बाहुली मातृष्का या नावाने ओळखली जाते. तर ९ मार्च १९५९ रोजी जन्माला आलेली अमेरिकन सुंदर बार्बी बाहुली आता ६७ वर्षांची होईल. अशा सुंदर, रूपवान, फॅशनेबल आधुनिक बाहुल्यांपेक्षा ठकी म्हणजे मायेच्या आई, आजी, आत्या, मावशी यांच्यासारखी वाटते. पण तिची कायमची रवानगी आता पुरातन वस्तू संग्रहालयात झाली आहे.

# विद्यार्थ्यांचा जय, म्हणजे शाळेचा विजय !



लेखक
**प्रशांत कुळकर्णी**

मुंबईतील गोरेगावच्या गोकुळधाम येथील साने गुरुजी मराठी शाळेतील आठवी ते दहावीचे वर्ग दुपारी सुटले होते. उंचीने काहिशी कमी असणारी,आठवी इयत्तेत शिकणारी मिरा, पुढे येऊन सुचना फलक वाचण्याचा प्रयत्न करत होती.

" चिमुरडीला फळ्यावरील सुचना वाचू द्या !" गौरी म्हणाली.

"धन्यवाद ताई ! मी फळ्यावरील सुचना पाहात होते!" मिरा म्हणाली.

"असं होय ! मग ये पुढे आणि वाच ! तुला दिसणार तरी आहे का ? सायकल चालव आणि उंची वाढव! बघावे तेव्हा उगीचच लुडबुड करत असतेस !" मिराच्या वर्गातील गर्विष्ठ गौरी म्हणाली.

लहानशी मिरा पुढे सरकली आणि तिने टाचा उंचावून शाळेचा फलक मोठ्या आवाजात वाचला. "वृक्षारोपण बोधवाक्य स्पर्धा! आणि "कचऱ्याचे करावे तरी काय ? उपाय सुचवा! करुन दाखवा ! बक्षीस मिळवा !

आतंर शालेय स्पर्धेत सर्वांनी भाग घ्या .

फलकावरचा मजकूर वाचल्यानंतर मिरा मागे वळून नम्रपणे म्हणाली, "तुम्ही सुध्दा स्पर्धेत भाग घ्या ! ऑल दी बेस्ट!"

त्या घोळक्यातील आठवी नववी इयत्तेची मुले उंचीने कमी असलेल्या मिरा कडे चेष्टेने पाहात होती.

शाळा सुटल्यानंतर शाळेतील मुलेमुली आपसात बोलत घरी चालले होते.

"आपण भाग घ्यायचा का बोधवाक्य स्पर्धेत ? मिराने ,सुजयला विचारले!

"बोधवाक्य म्हणजे,ते तर खुप छानच असायला हवे ! ते मला कसे सुचणार ? बोधवाक्य लिहा ते रंगवा! सुजय कंटाळून म्हणाला

"मिरा तुला चांगले विचार सुचतात ! तु लिहायला हवे बोधवाक्य ! अमेय ते आनंदाने रंगवेल छान पैकी ! करशील ना रे अमेया ? रोशनीने अमेयला विचारले.

"वा रे वा रोशनी ! मीच रंगवणार ! मी अक्षरे सजवणार ! मात्र बक्षीस घेणार तु आणि मिरा! मला काय मिळणार ? अमेय डोळे मोठे करून म्हणाला.

"स्वतःला मोठा कलाकार समजतोस !" सामाईक बक्षीस आहे आठवी आणि नववी, आपल्या सगळ्यांचे बक्षीस असेल ते ! दहावीच्या वर्गाने मात्र खुप खुप अभ्यास करायचा आणि शाळेचे नाव बोर्डाच्या परीक्षेत उज्वल करायचे!" मिरा म्हणाली,

सगळ्यांची घरे जवळ आली, तेव्हा राघवने सगळ्यांना थांबवले आणि म्हणाला,

आपण सर्वांनी एकमेकांना मदत करु! स्पर्धेत भाग घेऊ ! सुंदर बोधवाक्य तयार करु !

इतक्यात झाडावर बसलेल्या कावळ्यांने काव! काव! असा आवाज केला तेव्हा मिरा आनंदाने म्हणाली,

" बोधवाक्य सुचले! ते मी आताच्या आत्ताच लिहून दाखवते पण कुणाला सांगू नका ! संध्याकाळी अमेयच्या घरी जमूया ,आणि बोधवाक्य तयार करुया ! असे म्हणून तिने आपल्या दप्तरातील वही काढली,उभ्या उभ्याने बोधवाक्य लिहिले आणि सगळ्यांना दाखवले ! मिराने लिहिलेले बोधवाक्य वाचून सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरलेला दिसत होता .

संध्याकाळी साडेसात वाजता रोशनी, मिरा, अनघा, मंदा अश्या चौघीजणी जेव्हा अमेयच्या घराजवळ आले, तेव्हा पाटील चाळीच्या जवळ मदन ,सुर्या ,गौरी, आपसात बोलत उभे होते. मिराला पाहाताच गौरी म्हणाली,

"काय ग चिमुरडे आता कशासाठी आलीस ? बोधवाक्य शोधायला आलीस की काय ? आम्ही सुध्दा तयारी करत आहोत ?कचऱ्याचे करायचे काय ? आम्हाला सांगता येईल का एखादी तुझ्यासारखी चिटुकली कल्पना ?"

मिराची अशी मस्करी करून गौरी खो खो हसायला लागली. मिरा बिचारी काहीही बोलली नाही. तिला जवळच एक भंगार सामानाचे दुकान दिसले, तिथे बोट दाखवून मिरा म्हणाली,

"माझे बाबा म्हणतात मागा म्हणजे मिळेल! शोधा म्हणजे सापडेल ! मी सांगते एक कल्पना ! तुम्हाला कचऱ्याचे काय करायचे ते मात्र करुन दाखवावेच लागेल!" असे म्हणून मिरा त्यांच्या जवळ गेली हळूहळू काहितरी सांगितले. मिराची कल्पना ऐकून गौरी ,मदन,सुर्या थक्क झाले.

उंची कमी आहे म्हणून आपण मिराची चेष्टा केली, ति मिरा किती चांगली मुलगी आहे! तिचे वागणे, बोलणे, किती नम्र आहे! असे विचार मनात आल्यामुळे गौरीला स्वतःच्या वागण्याचे खूप वाईट वाटले ! तेव्हा मिरा गौरीकडे पाहून हसत हसत म्हणाली,

" गौरी आपण सगळे एक आहोत आपला विजय म्हणजे शाळेचा जय ! चला कामाला लागूया ! " मिरा तु किती छान छान आहेस ग! दिसतेस लहानखुरी ! बुध्दीमान आहेस तु खरीखुरी!

गौरीचे बोलून झाल्यावर मिरा म्हणाली,

"माझे बाबा म्हणतात कानाने ऐकायचे , नवीन शिकायचे! उघड्या डोळ्यांनी पाहायचे नवीन शोधायचे ! चांगले बोलायचे तसे चांगलेच वागायचे! आपण सगळे असे वागलो तर आपण एकमेकांना नक्कीच आवडणार !" सगळेजण एकजुटीने कामाला लागले.


दहा दिवसांनी आतंर शालेय स्पर्धा पार पडल्या. मिराच्या गटाने बोधवाक्य स्पर्धेतील सर्व टप्प्यात विजय मिळवून अंतिम फेरीत पहिला क्रमांक पटकावला. "कावळा म्हणतो काव काव! एक तरी झाड लाव लाव! हे बोधवाक्य संपूर्ण मुंबईत खुपच लोकप्रिय झाले. वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात होऊ लागले. गौरीच्या गटाची कल्पना " "कचरा पेटी नाही ज्ञानाची जाग !ओला कचरा फुलवुया बाग!

ह्या योजनेला पहिले बक्षीस मिळाले.

शाळेतील सर्व विद्यार्थी सुके कागद कचरा, तुटलेल्या पाण्याच्या बाटल्या, निकामी झालेले पेन पेन्सिली, टिफिन जुन्या फाटक्या वह्या, मोठ्या कचरा पेटीमध्ये जमा करु लागले.जमलेला कचरा भंगार सामानाचे व्यापारी विकत घेऊ लागले. मिळालेल्या पैशातून शाळेच्या वाचनालयात नवीन नवीन पुस्तके येऊ लागली. ओला कचरा म्हणजे टिफिन मधील अन्नाचे कण, बिस्किट, चकली,चपातीचे तुकडे वेगळ्या पेटीत जमा होऊ लागला . विज्ञानाच्या शिक्षकांनी त्यात माती आणि गांडूळ खत मिळवले. कंपोस्ट खत तयार होऊ लागले ,कंपोस्ट खतामुळे बाग सजली, गुलाब मोगऱ्याची फुले उमलली.

**विद्यार्थ्यांचा जय म्हणजे शाळेचा विजय !**

**साने गुरुजी शाळेतील विद्यार्थ्यांनी हे करुन दाखवले.**



# जेवल्यानंतर झोपणे

दुपारची वेळ होती, राजा अकबर आपल्या दरबारात बसून काहीतरी विचार करत होता. अचानक त्याला बिरबलाने सांगितलेली गोष्ट आठवली. त्याला आठवले की एकदा बिरबलाने त्याला एक म्हण सांगितली होती, ती अशी - खाल्ल्यानंतर पडून राहणे आणि मारल्यानंतर पळणे हे प्रौढ माणसाचे लक्षण आहे.


राजाने विचार केला, "आता दुपारची वेळ झाली आहे. बिरबल खाऊन झोपायची तयारी करत असेल. आज त्याचा मुद्दा चुकीचा सिद्ध करूया." असा विचार करून त्याने एका सेवकाला हुकूम दिला की, यावेळी बिरबलाला दरबारात हजर राहण्याचा निरोप द्यावा. त्यावेळी जेवण करून बिरबल नुकताच बसला होता जेव्हा तो नोकर राजाचा आदेश घेऊन बिरबलाकडे पोहोचला. या आदेशामागे दडलेला राजाचा हेतू बिरबलाला चांगलाच समजला. तो नोकराला म्हणाला, तू थोडा वेळ थांब. मी कपडे बदलून तुझ्यासोबत येतो."

आत जाऊन बिरबलाने स्वतःसाठी एक घट्ट पायजमा निवडला. पायजमा घट्ट असल्याने ते घालण्यासाठी बिछान्यावर पडून राहावे लागले. पायजमा घातल्याचा बहाणा करून तो थोडावेळ पलंगावर पडून राहिला आणि नंतर नोकरासह दरबारात गेला. दरबारात राजा बिरबलालाच शोधत होता. तिथे पोहोचताच बादशहाने विचारले, "का बिरबल. आज जेवल्यावर झोपलो की नाही?" बिरबलाने उत्तर दिले, महाराज. आडवा झाला होतो." हे ऐकून राजाला खूप राग आला. त्याने बिरबलाला विचारले, "याचा अर्थ तू माझ्या आदेशाचे उल्लंघन केले आहेस का? त्यावेळी तू माझ्यासमोर का आला नाहीस? यासाठी मी तुला शिक्षा करतो."

बिरबलाने लगेच उत्तर दिले, महाराज. मी थोडा वेळ पडून राहिलो हे खरे आहे, पण मी तुझी आज्ञा मोडली नाही. तुमचा माझ्यावर विश्वास नसेल तर तुम्ही त्या सेवकाला त्याबद्दल विचारू शकता. होय, हा घट्ट पायजामा घालण्यासाठी मला बिछान्यावर पडावे लागले ही वेगळी बाब आहे." बिरबलाचे हे बोलणे ऐकून अकबर हसल्याशिवाय राहू शकला नाही आणि त्याने बिरबलाला दरबारातून जाऊ दिले.

**धडा- या कथेतून आपल्याला हे शिकायला मिळते की आपण परिस्थिती जाणून घेतलेले एक पाऊल आपल्याला अनेक संकटांपासून वाचवू शकते.**

## मनोरंजक शब्दकोडे



**आडवे शब्द :**
१) एकमेकाशी निगडित जीवन ५) घराच्या आतील खोली ८) जंगलात राहणे ९) डोकं ११) चिंतन १२) महानगरपालिकेचे संक्षिप्त रूप १४) लाकडाची मोळी १५) श्रीमंत १७) फिर्याद १८) स्वर्गातील काल्पनिक बाग १९) सरिता २१) स्त्री २२) काम करण्यासाठीची ठरावीक वेळ २३) अर्क २४) विनंती २५) शांत २६) गर्व, मत्तपणा २७) वर; ××× देव २८) गर्दन २९) आजूबाजूचा गोंगाट ३१) लक्ष ३२) बोभाटा ३३) शंभर

**उभे शब्द :**
१) सोशीकपणा २) हिंदी सिनेमातील एक खलनायक ३) अरण्य ४) नवीन ६) औद्योगिकदृष्ट्या पुढारलेला देश ७) कची १०) जिनसांची यादी १२) मकरंद १३) बिहारमधील राजकीय नेते - चिराग ×××× १४) गुजरातमधील प्रसिद्ध शहर १५) हाक १६) मनसोक्त १८) शंकराचे वाहन २०) सूर्य २१) आईची बहीण २३) वर्ष २४) हलुवार २५ अ) चलाख, चपळ २६) मनुष्य, माणूस २७) ×× दमयंती २८) ठाव २९) एक चतुष्पाद प्राणी ३०) दह्याचे द्रवरूप.

## चैत्रातील 5 फरक ओळखा




## चित्र रंगवा




## बाल चित्ररंग




यहोशवा भालेराव
सेंट झेवियर्स हाई स्कूल (कल्याण)



## चला चित्र शिकूया



## स्टाईल मारो



ओवी केळुस्कर